


विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना उजळवणारा...

# ज्ञानदीप

स्मरणिका २०१९

वर्ष : १८ वे
अंक : ९ वा

श्री गजानन महाराज शिक्षण प्रसारक मंडळ संचालित


सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्न (पी.यू./पी.एन./ए.सी./१८१-२००२)

## शरदचंद्र पवार कला व वाणिज्य महाविद्यालय

डुडुळगाव (आळंदी), ता. हवेली, जि. पुणे.

Estd. 9th Aug 1990

ESTABLISHED 2002 SHARADCHANDRA PAWAR ARTS & COMMERCE COLLEGE




# अनुक्रम

## संस्थेविषयी


| | | |
|---|---|---|
| संस्थेची थोडक्यात ओळख व संस्थेचे ध्येय... धोरण | - | ०४ |
| श्री गजानन महाराज शिक्षण प्रसारक मंडळ : शाखा विस्तार | | ०६ |
| संस्थापक, शिक्षणमहर्षि स्व. विलासराव तांबे परिचय | - | ०८ |
| संस्थेची उद्दिष्ट्ये + संपादकीय मंडळ | - | १० |
| प्राचार्यांचे मनोगत | डॉ. पांडुरंग उत्तमराव मिसाळ | १२ |
| संपादकीय | प्रा. आर. एस. कदम | १३ |


## शब्दप्रवास (लेख)


| | | |
|---|---|---|
| स्वामी विवेकानंद : एक व्यक्तिमत्त्व | अश्विनी कुऱ्हाडे | १६ |
| जगायला शिकवणारा करोडपती:सावजी ढोलकिया | माऊली अशोक पागिरे | १८ |
| स्त्री : चूल आणि मूल | माधुरी संजय पाण्डेय | १९ |
| आनंदी मन | प्रा. डी. जी. ताम्हाणे | २० |
| माझ्याकडे वेळ आहे... | प्रा. दिलीप श्रीराम बारी | २२ |
| समाधानाचा मूलमंत्र | उमेश महादू ढमाले | २२ |
| माझी मराठी | पूनम चंद्रकांत म्हस्के | २३ |
| तुलनेत तोलताना... | सूरज जयवंत कुलकर्णी | २३ |
| मायेचा सागर.... आई | अर्जुन उल्हासराव आळसे | २४ |
| बाप माणूस | प्रा.डॉ. रणजित कदम | २६ |
| गनिमी कावा | आकाश अर्जुन भडगावी | २६ |
| आधुनिक तंत्रज्ञान : शाप की वरदान | अश्विनी बाळकृष्ण वाघ | २७ |
| भारतीय लोकशाहीतील अडसर | प्रा. माणिक कसाब | २८ |



# INDEX


| | | |
|---|---|---|
| बाप | सोनाजी पांडुरंग टिळेकर | ३० |
| प्रतिबिंब | राजू वधे | ३१ |
| सोशल मिडिया | गायत्री जाधव | ३२ |
| मुलगी का नको? | अक्षय तवार | ३४ |
| कॉलेजचे स्नेहसंमेलन : विद्यार्थ्यांसाठी व्यासपीठ | योगीराज ज्ञानेश्वर खैरनार | ३५ |
| **काव्य-मैफिल** | | |
| विद्यार्थ्यांची काव्यमैफिल (इंग्रजी विशेष लेखांसह) | विविध कविंचे आविष्कार | ३७-५० |
| वर्गनिहाय गुणवत्ताप्राप्त 'टॉपर्स' | | ५१ |
| विविध समित्या व त्यांचे पदाधिकारी | - श्रेयनामावली | ५२ |
| मान्यवरांची संस्था भेट | - | ५३ |
| Various Working Committees | - | ५५ |
| **वार्षिक अहवाल** | | |
| संक्षिप्त वार्षिक अहवाल | - डॉ.विशाल गायकवाड व सहकारी | ५६ |
| विविध समित्यांचे वार्षिक अहवाल | - समितीचे अध्यक्ष | ५८-६५ |
| संस्थेच्या विविध उपक्रमांचे वृत्तपत्रीय प्रतिबिंब | - संस्था प्रसिद्धी विभाग | ६६ |
| राष्ट्रीय सेवा योजनेच्या उपक्रमांची सचित्र झलक | - विभागप्रमुख | ६८ |
| संस्थेच्या वाटचालीची क्षणचित्रे | - संस्था छायाचित्रण विभाग | ७० |
| पसायदान | - संत ज्ञानेश्वर माऊली | ७२ |



सदर नियतकालिकातील मते व विचार प्रत्येक लेखकाचे व्यक्तिगत असून प्रकाशक, संपादक, महाविद्यालय अथवा संस्था त्यास सहमत असेलच असे नाही. हा अंक खासगी वितरणासाठी आहे.



Estd. 9th Aug 1990

## शरदचंद्र पवार कला व वाणिज्य महाविद्यालय

# संस्थेची थोडक्यात ओळख

डुडुळगाव (आळंदी)सारख्या तीर्थक्षेत्राच्या परिसरात शैक्षणिक वर्ष २००२ मध्ये शिक्षणमहर्षि स्व. विलासराव तांबे यांनी या महाविद्यालयाची स्थापना केली. महाराष्ट्र शासन तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची मान्यता मिळाल्यानंतरच कामकाज सुरु केले गेले. त्यामुळे संस्थेविषयी सुरुवातीपासूनच पालकांच्या मनामध्ये विश्वास निर्माण झाला.

हे महाविद्यालय कायमस्वरुपी विनाअनुदानित असल्याने कोणतीही शासकीय मदत नसताना महाविद्यालयाने शैक्षणिक वाटचाल यशस्वीरित्या सुरु ठेवली आहे. मोजक्या विद्यार्थ्यांना सोबत घेऊन सुरु झालेल्या या महाविद्यालयाने आता १५व्या वर्षात पदार्पण करीत असताना सुमारे २०००+ विद्यार्थी संख्येचा टप्पा गाठला आहे.

संख्यात्मक वाढीपेक्षा त्यासोबतच गुणात्मक वाढ होण्यावरही संस्थेने भर दिल्याने महाविद्यालय आज आघाडीवर आहे. विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देतानाच त्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्याचे कामही केले जाते. क्रीडा स्पर्धा, स्नेहसंमेलन इ.च्या माध्यमातून एक हक्काचे व्यासपीठ विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन दिले जाते. या वैभवशाली परंपरेच्या महाविद्यालयात आपण प्रवेश घेत आहात.

त्या परंपरेचा पाईक होण्याचा आपणही मनापासून प्रयत्न करावा, ही अपेक्षा आहे.

***



ESTABLISHED 2002
SHARADCHANDRA PAWAR ARTS & COMMERCE COLLEGE
ENLIGHTENING KNOWLEDGE

### शरदचंद्र पवार कला व वाणिज्य महाविद्यालय

# ध्येय-धोरणे आणि विश्वस्त मंडळ

## VISION

Shri Gajanan Maharaj Shikshan Prasark Mandal will be a group of institutions having national eminence and international visibility, with high quality faculty, academic freedom to pursue cutting-edge technology and all persuasive research culture and acceptance of a value system with trust and empowerment at all levels.

## MISSION

To uplift the rural society through education by providing pre-primary to postgraduate education in diversified areas.

To setup a strong infrastructure to promote high standard education to meet the needs of trained man-power in Maharashtra and beyond.

## कार्यकारी विश्वस्त


| | |
|---|---|
| श्री. विशाल विलासराव तांबे<br>अध्यक्ष | श्री. श्रीहरी भाऊसाहेब तांबे<br>उपाध्यक्ष |
| श्री. वैभव विलासराव तांबे<br>सचिव | श्री. मयुर मुरलीधर ढमाले<br>कोषाध्यक्ष |
| श्रीमती नीलम विलासराव तांबे<br>संचालिका | प्रा. कृष्णराव शंकरराव पाटील<br>संचालक |
| डॉ. सुभाष शिवनाथ हांडे<br>संचालक | डॉ. संध्या राम गुंजाळ<br>संचालिका |



Estd. 9th Aug 1990

# श्री गजानन महाराज शिक्षण प्रसारक मंडळ

## शाखा विस्तार

सावित्रीबाई फुले विद्यालय, ओतूर, जि. पुणे

वीर सावरकर विद्यालय, पांगरीमाथा, ओतूर, जि. पुणे

शारदाबाई पवार विद्यालय, आंबेगव्हाण, जि. पुणे

विद्याविलास विद्यालय, मुथाळणे, जि. पुणे

सीताबाई तांबे मुलींचे कनिष्ठ महाविद्यालय, ओतूर, जि. पुणे

प्रतिभाताई पवार प्रशाला, ओतूर, जि. पुणे

श्री गजानन महाराज कन्या छात्रालय, ओतूर, जि. पुणे

विलास तांबे कॉलेज ऑफ एज्युकेशन (बी.एड्.), डुंबरवाडी, जि. पुणे

विलास तांबे कॉलेज ऑफ एज्युकेशन (एम.एड्.), डुंबरवाडी, जि. पुणे

शरदचंद्र पवार इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी (डी.फार्म), डुंबरवाडी, जि. पुणे

शरदचंद्र पवार इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी (बी.फार्म), डुंबरवाडी, जि. पुणे

शरदचंद्र पवार इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी (एम.फार्म), डुंबरवाडी, जि. पुणे

शरदचंद्र पवार इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, डुंबरवाडी, जि. पुणे

शरदचंद्र पवार कॉलेज ऑफ इंजिनियरिंग, डुंबरवाडी, जि. पुणे

व्हिजन इंटरनॅशनल स्कूल, खामुंडी, जि. पुणे

शरदचंद्र पवार कला व वाणिज्य महाविद्यालय, डुडुळगाव (आळंदी), जि. पुणे

ज्ञानविलास कॉलेज ऑफ फार्मसी, डुडुळगाव (आळंदी), जि. पुणे

रामचंद्र पाटील औटी कनिष्ठ महाविद्यालय, डुडुळगाव (आळंदी), जि. पुणे

राजा शिवछत्रपती विद्यालय, डुडुळगाव (आळंदी), जि. पुणे

आदित्य स्कूल, डुडुळगाव (आळंदी), जि. पुणे

# शिक्षणमहर्षि स्व. विलासराव तांबे

# अल्प परिचय



**जन्म -** २ सप्टेंबर १९४७ (राजुरी, ता. जुन्नर, जि. पुणे)

**पत्ता -** ओतूर, ता. जुन्नर, जि. पुणे.

**शिक्षण -** इन्टर एस.टी. सी. सी.पी. एड. (मुंबई)

**१९६२ -** विद्यार्थीदशेत विधानसभा निवडणुकीत सक्रीय भाग घेऊन आणे-माळशेज रस्त्यासाठी वि. ना. आवटे यांचा प्रचार केला.

**१९६४ -** जुनी एस.एस.सी. झाल्यावर नोकरीसाठी मुंबईमधील रामनारायण झुनझुनवाला कॉलेज, घाटकोपर येथे शिपाई म्हणून नोकरी.

**१९६५ -** काळबादेवी येथे पोस्टमनची नोकरी. पुढील शिक्षण १९७0 पर्यंत सुरु.

**१९६६ -** मुंबई शहरात मराठी माणसाच्या न्याय्य हक्कासाठी स्थापन झालेल्या शिवसेनेत सक्रीय सहभाग, बाळासाहेब ठाकरेंचा सहवास. मांडवी कोळीवाड्याचा विभाग प्रमुख म्हणून निवड.

**१९६८ -** आमदार डी. के. राजर्षि यांच्यासाठी ठाणे विधानसभा निवडणुकीत सक्रीय भाग.

**१९७0 -** मुंबई सोडून गावी ग्रामविकास मंडळ, ओतूर येथे माध्यमिक शिक्षकाची नोकरी १९८८ पर्यंत.

**१९७१ -** ना. शरदचंद्र पवार यांच्या नेतृत्वाखाली युवक काँग्रेस कार्यकर्ता म्हणून जिल्ह्यात सक्रीय.

**१९७२ -** ओतूर येथे वडिलांना रासायनिक खते, कीटकनाशक औषधे, बी बियाणे व सिमेंटचे दुकान सुरु करुन दिले. विधानसभा निवडणुकीत आमदार श्रीकृष्ण तांबे (झांबरशेठ) यांच्यासाठी त्यांच्या निवडणुकीत प्रमुख सहभाग

**१९७३ -** आ.श्रीकृष्ण तांबे (झांबरशेठ) यांच्या अकाली निधनाने झालेल्या पोटनिवडणुकीत लतानानी तांबे यांना आमदार म्हणून निवडून आणण्यात सक्रीय सहभाग.

**१६ मे १९७६ -** नीलमताईशी विवाह (सौ.नीलम तांबे या विघ्नहर सहकारी कारखाना जुन्नर/आंबेगावच्या संचालिका आहेत.)

**१९७७ -** सासरे हरीभाऊ शेठ गुंजाळ यांच्या मदतीने केळीचा व्यापार सुरू

**४ सप्टें. १९७९ -** विशाल तांबे (चिरंजीव) यांचा जन्म. (विशाल तांबे हे पुणे महानगरपालिकेचे नगरसेवक तसेच आपल्या संस्थेचे विद्यमान अध्यक्ष आहेत.)

**१९८० -** कृषी उत्पन्न बाजार समिती जुन्नरचे संचालक

**१९८१ -** स्टोन क्रशरचा नवीन व्यवसाय डुंबरवाडी येथे सुरू.

**१९८३ -** नीलम टाईल्स फॅक्टरी, डिंगोरे येथे सुरू केली.

**१९८५ -** आमदार वल्लभशेठ बेनके यांना निवडून आणण्यासाठी सक्रीय प्रयत्न. त्यांना प्रत्येक निवडणुकीत २५ वर्षे स्वखर्चाने सहकार्य केले. दरम्यान ओतूरच्या ग्रामविकास मंडळाचे संचालक पदी निवड.

**११ नोव्हेंबर १९८८ -** भीषण अपघात, ६ महिने संचेती हॉस्पिटलमध्ये दाखल. शिक्षकी पेशाचा राजीनामा देऊन महिला शिक्षणासारख्या सामाजिक कार्याला वाहून घेण्याचा निश्चय त्यावेळी केला.

**१९८९ -** 'महिलांसाठी शिक्षण, सर्वासाठी शिक्षण' या ध्येयाने श्री गजानन महाराज शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना. संस्थापक अध्यक्ष, मुख्य विश्वस्त.

**९ ऑगस्ट १९९०-** उत्तर पुणे जिल्ह्यातील पहिली मुलींची शाळा सावित्रीबाई फुले कन्या विद्यालयाची ओतूर येथे स्थापना.

**११ ऑगस्ट १९९१ -** शिक्षणापासून वंचित असलेल्या १५० मुलींसाठी ओतूर येथे मोफत वसतिगृह सुरु केले.

**११ ऑगस्ट १९९२ -** मुलींसाठीचे आय. टी. आय. डुंबरवाडी येथे सुरु करुन शैक्षणिक विकासाला चालना दिली.

**११ ऑगस्ट १९९३ -** मुलींसाठी ज्युनिअर कॉलेज (विना अनुदानित) सुरू केले.

**११ ऑगस्ट १९९४ -** ADCSSAA कॉम्प्युटरचा पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू

**१९९८ -** चैतन्यनगर, धनकवडी, पुणे येथे बी. टी. ई. व पुणे विद्यापीठाच्या मान्यतेने मॅनेजमेंट इन्स्टिट्यूट सुरू

**२००२ -** आळंदी येथे आर्टस् अँड कॉमर्स कॉलेज (विना-अनुदानित) सुरु केले.

**२००३ -** डी. फार्मसी कॉलेज डुंबरवाडी, ओतूर येथे सुरू

**२००४ -** बी. फार्मसी कॉलेज डुंबरवाडी, ओतूर येथे सुरु. उत्तर पुणे जिल्ह्यातील पहिले महिला महाविद्यालय (विनाअनुदानित) तत्त्वावर ओतूर येथे सुरू

**२००६ -** मुलींसाठी डी. एड. कॉलेज डुंबरवाडी, ओतूर येथे सुरू

**२००७ -** मुलींसाठी बी. एड. कॉलेज, मुला-मुलींसाठी एम.बी.ए. कॉलेज, २८ सप्टें. २००७ इंजिनिअरिंग कॉलेजचे भूमीपूजन.

**२००८ -** उत्तर पुणे जिल्ह्यातील पहिल्या इंजिनिअरिंग कॉलेजला मान्यता. मुलींसाठी एम. एड. कॉलेज डुंबरवाडी, ओतूर येथे सुरू

**२००९ -** एम. फार्मसी पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु. इंजिनिअरिंग व पॉलिटेक्निक कॉलेज सुरू

**पुरस्कार -** ज्वेल ऑफ इंडिया व डॉ. मणिभाई देसाई ट्रस्टचा 'विद्यारत्न' पुरस्कार प्राप्त

**भूषविलेली पदे -** संचालक, कृषि उत्पन्न बाजार समिती, जुन्नर. उपाध्यक्ष, देवधर्म संस्था ओतूर. राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्थापनेपासून पुणे जिल्हा कार्यकारिणी सदस्य.

**आवडते खेळ** - फुटबॉल, बॅडमिंटन

**परदेश प्रवास -** संपूर्ण युरोप, रोम, इटली, बेल्जियम, हॉलंड, डेन्मार्क , ऑस्ट्रिया, जर्मनी, फ्रान्स, इंग्लंड, इन्सबॅक, लुसन, बार्सिलोना, स्वित्झर्लंड, ब्रुसेल, ॲमस्टरडॅम, पॅरिस, जपान, चीन, इस्त्रायल, पॅलेस्टाईन, नेपाळ.

**सेवाभावी कार्य -** समाजातील दीन-दलितांचा उद्धार, ग्रामीण भागात महिला शिक्षण, स्वयंरोजगार निर्मिती, दर्जेदार तांत्रिक शिक्षण देण्याचे कार्य, अनेक मुलींचा शिक्षणाचा खर्च करून त्यांना स्वतःच्या पायावर उभे केले. आदिवासी, भटक्या, विमुक्त, परित्यक्ता महिला, मुस्लिम व दूर्बल घटकातील मुलींच्या शिक्षणासाठी विशेष प्रयत्न.

**समाज गौरव -** महाराष्ट्रात विविध क्षेत्रात सामाजिक कार्य करणाऱ्यांचा प्रतिवर्षी सत्यशोधक'समाजभूषण' पुरस्काराने गौरव. जुन्नर तालुक्यातील सुपुत्रांनी केलेल्या विशेष समाजपयोगी कार्याबद्दल त्यांना 'शिवनेरीभूषण' पुरस्काराने प्रतिवर्षी सन्मानित करण्यात येते. १९९३ पासून आजतागायत पुरस्कारांची ती परंपरा सुरू आहे.

**आवड -** ऐतिहासिक स्थळांना भेटी देणे. छत्रपती शिवाजी महाराज, नेपोलियन बोनापार्ट, अब्राहम लिंकन, सुभाषचंद्र बोस, स्वातंत्र्यवीर सावरकर, राजर्षि शाहू महाराज, महात्मा फुले यांचे वाङ्मय वाचण्याची आवड

**व्यसन -** निर्व्यसनी राहून आपले वेगळेपण जपले. शिक्षणाचा तळागाळापर्यंत प्रसार हेच एकमेव व्यसन आयुष्यभर सांभाळले.

**जीवनातील प्रभाव -** याविषयी ते स्वतः म्हणतात, 'गरिबीतही स्वाभिमानाने जगायला शिकवणारी माझी आई वेगळीच होती. 'चांगल्याच्या जोड्याजवळ बस, परंतु वाईटांच्या मांडीजवळ बसू नकोस.' जीवनाचे हे बाळबोध तत्त्वज्ञान बालमनावर बिंबवले. माझे मामा रामचंद्र पाटील औटी, चुलते श्रीकृष्ण तांबे (झांबरशेठ) यांच्या विचारांचे संस्कार बालपणापासून झाले. आदरणीय लोकनेते शरदचंद्र पवार यांच्या प्रेरणेतून ग्रामीण भागात महिला शिक्षण व तांत्रिक शिक्षणाची गंगा 'सत्तेत नसताना' किंवा कोणत्याही पदावर नसताना आणि कोणतेही आर्थिक पाठबळ नसताना आणू शकलो याचे समाधान वाटते.'

***

# संस्थेची उद्दिष्ट्ये

- ✻ महिलांसाठी शिक्षण - सर्वांसाठी शिक्षण
- ✻ शिक्षणाने सुसंस्कारित महिला घडवणे. कारण एक महिला दोन घरी प्रगतीचा प्रकाश आणू शकते.
- ✻ गतिमान शिक्षणातून सामाजिक परिवर्तनासाठी हातभार लावणे.
- ✻ अखिल मानवी समाजाच्या कल्याण व संवर्धनासाठी सातत्याने प्रयत्न करणे.
- ✻ आमच्या विविध शैक्षणिक संस्थांमधून विद्यार्थ्यांना सुयोग्य शिक्षण देऊन त्यांच्यातूनच सुजाण नागरिक, कार्यक्षम व्यावसायिक, तज्ज्ञ आणि दूरदृष्टी आणि मानवी हिताचे भान असणारे विचारवंत निर्माण करणे.
- ✻ अत्याधुनिक शैक्षणिक साधनाद्वारे आणि आधुनिक अध्यापन पद्धतीचे उपयोजन करून विद्यार्थ्यांना सर्वसमावेशक शिक्षण व प्रशिक्षण देणे.
- ✻ शैक्षणिक क्षेत्रात होणारे बदल अंगिकारुन त्याप्रमाणे स्वतःमध्ये बदल करुन येणाऱ्या आव्हानांना समर्थपणे सामोरे जाणारे विद्यार्थी तयार करणे.
- ✻ उच्च शिक्षण संस्थांच्या मालिकांमध्ये आमच्या शिक्षण संस्थांना मानाचे स्थान मिळेल यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणे तसेच या प्रयत्नामध्ये विद्यार्थ्यांना सामावून घेणे.

# जाहीर प्रकटन


| | |
|---|---|
| प्रकाशन स्थळ | : शरदचंद्र पवार कला व वाणिज्य महाविद्यालय डुडुळगाव (आळंदी) ✻ फोन : ०२०-२०२८०१४९ |
| मुद्रक | : स्पेक्ट्रम ऑफसेट, पुणे, फोन : २५४३६५५६ |
| प्रकाशन कार्यकाल | : वार्षिक |
| मालकी | : श्री गजानन महाराज शिक्षण प्रसारक मंडळ संचालित शरदचंद्र पवार कला व वाणिज्य महाविद्यालय, डुडुळगाव (आळंदी), ता. हवेली, जि. पुणे. |
| मुद्रक व प्रकाशक | : प्र. प्राचार्य डॉ. पांडुरंग उत्तमराव मिसाळ |
| राष्ट्रीयत्व | : भारतीय |
| पत्ता | : शरदचंद्र पवार कला व वाणिज्य महाविद्यालय, डुडुळगाव (आळंदी), ता. हवेली, जि. पुणे. |
| संपादक | : प्रा. आर. एस. कदम |
| राष्ट्रीयत्व | : भारतीय |
| पत्ता | : शरदचंद्र पवार कला व वाणिज्य महाविद्यालय, डुडुळगाव (आळंदी), ता. हवेली, जि. पुणे. |

मी प्र. प्राचार्य डॉ. पांडुरंग उत्तमराव मिसाळ जाहीर करतो की, वर दिलेली माहिती माझ्या समजूतीप्रमाणे बरोबर आहे.

**✻ मुखपृष्ठ व सजावट ✻**
धनंजय देशपांडे, पुणे ✻ ०२० - २४४८७४८०




## अर्पण पत्रिका

विद्यार्जनाचे व्रत हाती घेऊन
त्या कार्यात संपूर्णपणे झोकून देऊन
अथक परिश्रम करतानाच
स्वत:मधील 'कला-साहित्य-संस्कृती'
ही सर्वांगीण विकासाची मूल्ये
अंगी जोपासणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना व
त्यांना प्रोत्साहन देणाऱ्या त्यांच्या पालकांना
ही 'स्मरणिका' विनम्र अर्पण

## आपले अभिप्राय

'ज्ञानदीप' स्मरणिका आपण पहावी, वाचावी ही अपेक्षा तर आहेच. त्याचबरोबर आपणांस ती कशी वाटली याचे योग्य मूल्यमापनही आपण करुन आपले अभिप्राय, सूचना आम्हास जरुर कळवा.

## अभिनंदन

संस्थेचे माजी विद्यार्थी आजमितीस समाजात विविध क्षेत्रात स्वकौशल्याने लौकिक मिळवत आहेत. त्यांच्यासह संस्थेचीही प्रतिमा प्रकाशमान करणाऱ्या या सर्वांचे अभिनंदन!!

---

## संपादकीय मंडळ



**प्रा.डॉ. पांडुरंग उत्तमराव मिसाळ**
संपादक व प्र. प्राचार्य

**प्रा. आर. एस. कदम**
कार्यकारी संपादक

*** सदस्य ***

प्रा. संजीव कांबळे

प्रा. चाँदपाशा मुल्ला





# प्राचार्यांचे मनोगत

**शिक्षण हा जीवन पुष्पांचा सुगंध आहे.**
**जीवन विणेचे ते छेडलेले सप्तस्वर आहेत.**
**इंद्रधनुतील रंगांची तालबध्द**
**पावलांनी केलेली ती उधळण आहे.**
**शिक्षण हा जीवनाचा श्वास आहे,**
**नव्हे नव्हे.........**
**शिक्षण जीवनाचा प्राण, आत्मा आहे.**

माऊली महावैष्णव संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांच्या संजीवन समाधीने पुनित झालेली आळंदी व डुडुळगाव पंचक्रोशीची शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक, राजकीय, आर्थिक, वैज्ञानिक, सांस्कृतिक व बौद्धिक ज्ञानाचा वसा आणि ध्यास घेतलेल्या व जीवनाचे सार सर्व स्वशिक्षण वरील उक्तीप्रमाणे मानणाऱ्या, श्री गजानन महाराज शिक्षण प्रसारक मंडळाचे शरदचंद्र पवार कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या इतिहासातील दीपस्तंभाप्रमाणे असणारा 'ज्ञानदीप' हा वार्षिक नववा अंक आपल्या हाती देताना आम्हांस सर्वांना विशेष आनंद होत आहे. या अंकाचे नावच 'ज्ञानदीप' म्हणजेच ज्ञानाचा अखंड विलास होय. महाविद्यालयाच्या प्रगतीचा व विद्यार्थ्यांच्या अंगी असणाऱ्या सर्व कलागुणांचा, त्यांच्या आंतरभावविश्वाचे ते खरोखरच वास्तव प्रतिबिंब आहे.

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी शिक्षण पूर्ण करीत असताना त्यांच्या अंगी असणाऱ्या सर्वांगीण कला व गुणांचा विकास व्हावा व त्यांना त्यासाठी खुले व्यासपीठ मिळावे, विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या लेखनविषयक कौशल्याचा आविष्कार, लेख, कथा, कविता, चारोळी व निबंध इत्यादींच्या माध्यमातून देण्याचा हा चिमुकला प्रयत्न आहे. यातूनच भविष्यात एखादा लेखक, कवी, साहित्यिक निर्माण होऊ शकेल, ही अपेक्षा आहे. श्री तीर्थक्षेत्र आळंदी पंचक्रोशीतील शिक्षण घेणारे विद्यार्थी यांच्यात कसदार साहित्य निर्माण करण्याचे समर्थ्य आहे. त्यांनी ही भावसुमने आपल्यासारख्या सुज्ञ जाणकार रसिकांच्या सेवेसाठी वाहिलेली आहेत.

'ज्ञानदीप' या वार्षिक नियतकालिकामधील वार्षिक अहवाल महाविद्यालयाच्या प्रगतीचे आलेख आहेत. महाविद्यालयात विविध समित्या व मंडळ कार्यरत आहेत. तसेच महाविद्यालयात महापुरूषांच्या जयंत्या व पुण्यतिथी साजऱ्या केल्या जातात. तसेच चर्चासत्र, कार्यशाळा, ज्ञानदीप व्याख्यानमाला, स्पर्धा परीक्षा, आरोग्य तपासणी, रोजगार मेळावा, क्रिडास्पर्धा, शैक्षणिक सहली, श्रमदान शिबिर, रक्तदान शिबिर, वृक्षारोपण, स्वच्छता अभियान, विविध स्पर्धांना विद्यार्थ्यांना बाहेर पाठविले जाते. मतदान जनजागृती अभियान राबविले जाते. वार्षिक स्नेहसंमेलन 'अंतरंग'चे आयोजन केले जाते. रस्ता सुरक्षा अभियान राबविले जाते. विविध सांस्कृतिक उपक्रम राबविले जातात.

शिक्षणमहर्षि स्व. विलासराव तांबे, (संस्थापक, श्री गजानन महाराज शिक्षण प्रसारक मंडळ) यांनी आळंदी पंचक्रोशीतील शिक्षणाची गरज ओळखली व इ.स. २००२ साली हे महाविद्यालय सुरू केले. या कामात श्रीमती नीलमताई तांबे यांनी त्यांना अतिशय मोलाची साथ दिली. प्रा. के. एस. पाटील सर (जेष्ठ संचालक) यांनी महाविद्यालयाच्या उभारणीच्या काळात विशेष प्रयत्न केले. श्री. मयुर ढमाले (कोषाध्यक्ष) यांच्या मार्गदर्शनामुळे आम्हांला सतत प्रोत्साहन मिळते. ते सर्वसाधारण विद्यार्थ्यांना केंद्रबिंदू मानून झटत असतात. मा. वैभव विलासराव तांबे (सचिव) यांच्यापासून सतत नवीन प्रेरणा मिळते. तसेच आदरणीय विशाल विलासराव तांबे (संस्थाध्यक्ष व नगरसेवक, पुणे मनपा) यांच्या बहुमोल मार्गदर्शनामुळे महाविद्यालयाच्या गुणात्मक वाढीचा विकास चांगला होत आहे. त्यामुळेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व महाराष्ट्र शासन, यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजनसाठीचा 'उत्कृष्ट महाविद्यालय' पुरस्कार जाहीर झाला. याचा आम्हांला अभिमान आहे. राज्यस्तरीय व राष्ट्रीयस्तरावर कार्यशाळा व चर्चासत्रात आपल्यातर्फे संशोधन पेपर सादरीकरण केले गेले आहे.

तसेच आमचे प्रेरणास्थान, स्फूर्ती देणारे मार्गदर्शन सहकार्य करणारे व सर्व प्राध्यापक, सहकारी वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थीनी डुडुळगाव, आळंदी ग्रामस्थ, जाहिरातदार, शुभेच्छुक, छायाचित्रकार- श्री. ज्ञानेश जंगले, या अंकाची अतिशय देखणी अशी सजावट करणारे श्री. धनंजय देशपांडे व त्यांचे सर्व सहकारी, कर्मचारी यांच्या तत्परतेमुळे हा अंक आम्ही रसिक, सूज्ञ वाचक मित्रांच्या हाती वेळेत देऊ शकलो. त्याबद्दल त्यांचे मनापासून आभारी आहोत. प्रा. डॉ. रणजित कदम यांनी दिलेल्या योगदानाबद्दल ते व त्यांचे सर्व समितीचे सदस्य यांना धन्यवाद !

हा अंक पूर्ण करताना ज्यांचे प्रत्यक्ष अप्रत्यक्ष हातभार लागले त्या सर्वांचे महाविद्यालयाच्या वतीने आभार मानतो.

**डॉ. पांडुरंग उत्तमराव मिसाळ**
एम. ए., एम. फिल., पीएच. डी., नेट
प्र. प्राचार्य

## संपादकीय

# हितगुज

**प्रिय रसिक मित्र–मैत्रीणी**
**आणि वाचकांना नमस्कार.....**

ज्ञानियांचे शिरोमणी संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्या संजीवन समाधीने पावन झालेल्या आळंदीच्या शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक वसा आणि वारसा जपणारे श्री गजानन महाराज शिक्षण प्रसारक मंडळाचे शरदचंद्र पवार कला व वाणिज्य महाविद्यालय डुडुळगाव (शैक्षणिक वर्ष २०१८-१९) मधील विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा आलेख दर्शविणारा 'ज्ञानदीप' हा अंक आपल्यासमोर ठेवताना मनस्वी आनंद होत आहे.

महाविद्यालयाचा 'ज्ञानदीप' हा अंक म्हणजे महाविद्यालयाच्या प्रगतीचे आणि विद्यार्थ्यांच्या अंगी असणाऱ्या सुप्त कला-गुणांचे व त्यांच्या अंतर्भाव विश्वाचे वास्तव प्रतिबिंब असते. प्रत्यक्ष ज्ञानाचा अखंड प्रकाशमय असणारा दीप म्हणजे महाविद्यालयाचा हा 'ज्ञानदीप' अंक अज्ञानरूपी अहंकार व अंधःकार नाहिसा करणारा आहे.

महाविद्यालयीन जीवन हे एक संवेदनशील जीवन असते. अभ्यास करून निश्चित ध्येयाकडे वाटचाल तर सुरूच असते त्याचबरोबर स्वतःमधल्या कलागुणांना वाव मिळण्यासाठी त्यांच्यामध्ये वाचन, संस्कृती रूजविण्यासाठी वार्षिक स्नेहसंमेलन, महाविद्यालयातील विविध सांस्कृतिक कार्यक्रम विद्यार्थ्यांच्या मनातील विचार शब्दांच्या माध्यमातून कागदावर उतरविण्यासाठी 'ज्ञानदीप' हे एक उत्तम माध्यम आहे.

महाविद्यालयीन विद्यार्थी देशाचा उत्तम नागरीक असतो. यासाठी महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राष्ट्रीय सेवा योजना, सांस्कृतिक महोत्सव, वार्षिक स्नेहसंमेलन, क्रिडा स्पर्धा यांसारख्या उपक्रमाच्या माध्यमांतून महाविद्यालयीन तरूण घडत असतो.

विद्यार्थ्यांना साहित्याची ओळख व्हावी, त्यांच्याकडून चांगले लिहिले, वाचले जावे, त्यांची मते-भावना, आर्थिक, सामाजिक दृष्टीकोन, मांडण्यासाठी प्रतिवर्षी 'ज्ञानदीप' हा अंक प्रकाशित केला जातो.

या अंकासाठी श्री गजानन महाराज शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा. विशाल विलासराव तांबे यांच्याकडून प्रेरणा मिळाली. तसेच संस्थेचे सचिव मा. वैभव विलासराव तांबे यांच्याकडून वेळोवेळी प्रोत्साहन मिळाले, तर संस्थेचे कोषाध्यक्ष मा. मयुर ढमाले यांनी मार्गदर्शन केले. ज्ञानदीप अंकाच्या कार्याची जबाबदारी माझ्यावर सोपवून विश्वास दाखविल्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पांडुरंग मिसाळ यांचे आभार मानतो. संपादकीय मंडळाचे सर्व सहकारी यांनी दिलेली मोलाची साद यातून हा अंक आपल्या समोर सादर करत आहोत.

ज्ञानदीप अंक वाचून आपणही आपला अभिप्राय जरूर कळवावा, ही विनंती. धन्यवाद.

**डॉ. रणजित सतिश कदम**
(एम.कॉम., एम.फिल., पी.एच.डी.)
**कार्यकारी संपादक**
(वाणिज्य विभाग प्रमुख)





मंगल कार्य तुमचे
हार्दिक सहकार्य आमचे
श्रीकृष्ण
मंगल कार्यालय
प्रोप्रा.: श्री. सुधीर विठ्ठलराव तुर्की * श्री. गिरीष विठ्ठलराव तुर्की
(श्री ज्ञानेश्वर महाराजांचे पुजारी)
आमचेकडे लग्न, मुंज व इतर धार्मिक विधी माफक दरात केले जातील.
मंगलकार्यासाठी 'केटरिंग' सुविधा उपलब्ध
ज्ञानेश्वर महाराज मंदिराजवळ, श्री क्षेत्र आळंदी देवाची, ता. खेड, जि. पुणे ४१२ १०५
फोन : ०२१३५ - २३२४११, ९८२२४४०९१२

# शब्द प्रवास

मनातील भावभावना व्यक्त होण्यासाठी
मनाची मशागत उत्तमरित्या
होण्याची गरज असते.
ती मनाची मशागत दोन पर्यायातून होऊ शकते.
एक तर लिहिणे व दुसरे म्हणजे वाचणे!
या दोन्हीचा समन्वय जेव्हा घडून येतो
तेव्हा त्या जीवनाचा खऱ्या अर्थाने
सर्वांग परिपूर्ण होण्याच्या दिशेने प्रवास सुरु होतो.

त्याच शब्दांच्या वाटेवरील काहींची वाटचाल
आणि त्यातूनच क्षितीजाला भिडणारा
हा सुंदर 'लेख'रस्ता...!!



## शब्द प्रवास

(लेख विभाग)



# स्वामी विवेकानंद

## एक व्यक्तिमत्व

**अश्विनी कुऱ्हाडे**
एस्.वाय्., बी.ए.

व्यक्तिमत्व सुंदर नसेल तर दिसण्याला अर्थ नसतो. पण जर माणसाचा स्वभाव व गुण चांगले असतील तर त्या मनुष्याचा व्यक्तिमत्व विकास होण्यापासून कोणीही रोखू शकत नाही. संघर्ष जेवढा जास्त, तेवढाच मोठा विजय असतो. व्यक्तीच्या विकासासाठी त्याच्या विचारांची जडणघडण चांगली असणे गरजेचे आहे. विचारांचे परिणाम अनुकूल असणारी अशी व्यक्ती म्हणजे स्वामी विवेकानंद.

१२ जानेवारी १८६३ कोलकत्ता येथे एक 'नरेंद्र' नामक तेजस्वी बालक जन्मला, त्याचा चेहरा अतिशय तेजस्वी होता. जणूकाही चेहऱ्यावरून तेज ओसंडून जात आहे. पहिल्याच वर्गात त्यांनी 'अमरकोश' पाठ केला. यावरून त्याची बुद्धी किती असामान्य असेल याची कल्पना येते. नरेंद्राने ब्राम्हण समाजात प्रवेश केला. मूर्तीमध्ये देव नाहीत, जाती नाहीशा केल्याच पाहिजेत. स्त्रीयांना शिक्षण दिलेच पाहिजेत, हे विचार ऐकून त्यांच्या मनात गोंधळ होत असे! तेव्हा देव खरचं आहे की नाही? असल्यास कोठे भेटेल? त्याची भेट कोण घडवून देणार? या सर्व विचारांनी त्यांचे मन अस्वस्थ झाले. ब्राह्मण समाजाचे तत्वज्ञ श्री. देवेंद्र त्यांच्या प्रश्नांची समाधानकारक उत्तर देऊ शकले नाहीत. तेव्हा कॉलेजचे प्राचार्य हेस्टी यांनी त्यांना रामकृष्ण परमहंस यांच्याकडे पाठवले. संत परमहंस यांनी आपल्या तीक्ष्ण दृष्टीने त्यांच्या डोळ्यांकडे पाहिले. ते आपल्या भक्तांना म्हणाले, 'हा नरेंद्र मानव जातीच्या उद्धारासाठीच जन्मलेला आहे. तो हिंदूधर्म आणि हिंदूस्थानची मान साऱ्या जगात उंचावेल !'

नरेंद्रला ते खरे वाटेना. त्याने रामकृष्णांना विचारले, 'तुम्ही देव पाहिला आहे का?' त्यावर रामकृष्ण उत्तरले, 'होय, मी देव पाहिला आहे, त्याच्याशी बोललो पण आहे, तुलाही देव सहज भेटेल,'

'केव्हा भेटेल मला देव?' नरेंद्राने विचारले.

'जेव्हा तुझ्या मनाला देव भेटण्याची तळमळ लागेल तेव्हा!'

रामकृष्णांनी हे म्हटल्यानंतरही त्यांचा त्यावर विश्वास बसेना. तेव्हा रामकृष्णांनी त्यांच्या हृदयाला स्पर्श केला. त्याचबरोबर सर्वत्र तेजाचे लोळ उठले. सर्वत्र प्रकाश पसरला व नरेंद्राला सर्वत्र प्रकाश



परमेश्वरच दिसू लागला! हेच नरेंद्र पुढे जाऊन 'विवेकानंद' झाले.

हिंदूधर्माचा प्रसार व त्याचा गाढ अभ्यास विवेकानंदांना होता. भारताच्या अध्यात्मिक संस्कृतीबद्दल गाढ अभिमान असला तरी, त्यात शिरलेल्या अनिष्ट रुढी, परंपरा, जातिभेद यांसारख्या हीन गोष्टींवर त्यांनी भाषणातून कडाडून हल्ला चढवला. निद्रिस्तांना गदागदा हलवून जागे केले. अशावेळी ते सौदामिनीच्या अभिनिवेशाने समाजातील निष्क्रियतेवर प्रहार करत आणि आपल्या देशबांधवांना जागे होण्यासाठी कळकळीचे आवाहन करत. निराकार समाधीत मग्न राहण्याची स्वतःची स्वाभाविक प्रवृत्ती बाजूला सारून त्यांनी सर्वसामान्य लोकांच्या सुखदुःखाचा ऐहिक पातळीवरही विचार केला आणि त्यांच्यासाठी झटले. 'परहितार्थ सर्वस्वाचे समर्पण म्हणजेच खरा संन्यास' हे वचन सार्थ केले.

इंग्रजांचे वर्चस्व असतांना भारतभूमी व हिंदू धर्म यांच्या उद्धारासाठी अहर्निश चिंता वाहणारी आणि तन, मन, धन व प्राण याच उद्धारासाठी अर्पण करणाऱ्या काही दैदिप्यमान रत्नांपैकी एक अग्रणी म्हणजे स्वामी विवेकानंद! धर्मप्रवर्तक, तत्त्वचिंतक, विचारवंत व वेदांन्तमार्गी, राष्ट्रसंत इत्यादी विविध नात्यांनी विवेकानंदांचे नाव सर्व जगात प्रसिद्ध आहे. ऐन तारूण्यात संन्यासाश्रमाची दीक्षा घेऊन, हिंदू धर्माचे प्रसारक बनलेले तेजस्वी व ध्येयवादी व्यक्तिमत्व म्हणजे स्वामी विवेकानंद! त्यांच्या जयंतीच्या दिवशी 'आंतरराष्ट्रीय युवकदिन' साजरा करण्यात येतो. स्वातंत्र्यानंतर भारतभूमी व हिंदू धर्म यांची झालेली दुरवस्था रोखण्यासाठी आजही स्वामी विवेकानंद यांच्या तेजस्वी विचारांची गरज आहे. याची जाणीव भारतवासियांना व्हावी, यासाठीच स्वामी विवेकानंदांचे अनुकरण करणे गरजेचे आहे.

The old religion said ; That he was an atheist, who did not believe in god, But my new religion says, That he is an atheist who does not believe in himself !

***- Swami Vivekanand***

***




## जगायला शिकवणारा करोडपती

# सावजी ढोलकीया

पैशाने करोडपती आणि मनाने उदार असणारे सावजी ढोलकीया, आपल्या कर्मचाऱ्यांवर इतक्या कोटींची उधळण करू शकतात तर आपल्या मुलांसाठी त्यांनी किती केली असेल? असा प्रश्न कोणाच्याही मनात येणं स्वाभाविक आहे. पण आयुष्य जगायला शिकवणारा हा करोडपती खूपच वेगळा आहे. दोन वर्षापूर्वी आपल्या २१ वर्षाचा मुलगा ज्याने अमेरिकेतून बिझनेस मॅनेजमेंटची पदवी घेऊन भारतात पाय टाकताच त्याला खऱ्या आयुष्याची चव त्यांनी चाखायला लावली. करोडपती असणाऱ्या बापाच्या पैशाचा माज त्याच्या डोक्यात जाऊ नये म्हणून ३ कपडे आणि फक्त ७००० रू. ते पण फक्त अतिशय निकडीच्या वेळी खर्च करण्याची ताकीद देऊन त्याची रवानगी कोची, केरळ या ठिकाणी केली. अट अशी होती की जिवंत राहण्यासाठी आणि पोट भरण्यासाठी, राहण्याची सगळी सोय त्याने स्वतःहून करायची. त्याच्याकडील त्याची सगळी ओळख काढून घेतली होती.

अमेरिकेत शिकून आलेला करोडपती बापाचा मुलगा कोचीमध्ये जॉबसाठी फिरत होता. त्याला आयुष्याचा खरा अर्थ तेव्हा कळला; जेव्हा एका वेळच्या जेवणावर भूक भागवावी लागत होती, संध्याकाळी 'पार्ले-जी'ची बिस्किट खाऊन पोट शांत करावं लागत होतं. जॉब शोधताना अनेक अपमानाचा अनुभव मिळाला. कधी एका सिक्युरिटी गार्डसोबत एका खोलीत झोपण्यासाठी कोंबून घ्यावं लागलं तर कधी हॉटेलच्या किचनमध्ये ३० लोकांसोबत जेवण आणि राहणं सोबत करावं लागलं. ह्या सगळ्यात मुलगा काय शिकला असेल तर खरं आयुष्य काय असते? त्याच्या शब्दात सांगायच झालं तर 'एकेकाळी मला बुटांची खूप आवड होती, खूप महागडे बूट माझ्याकडे होते. पण आता त्याची गरज वाटत नाही. आता मला पैशाची खरी किंमत कळली. मला आता अनुभव आहे, की जेव्हा आपल्याला हिणवलं जाते किंवा पैसा नाही म्हणून जग आपल्याला बाजूला काढते; तो अनुभव काय असतो ? मी हा अनुभव माझ्या आयुष्यात कधीही विसरणार नाही.'

आपल्या मुलाला चांगलं शिक्षण दिल्याचं कर्तव्य पूर्ण केल्यावर सावजी ढोलकीया ह्यांनी आपल्या मुलाच्या डोक्यात पैशाची हवा जाऊ दिली नाही. आयुष्यात काळ आणि वेळ कधी कशी येईल सांगता येत नाही. ह्या सगळ्या काळात आयुष्याला सामोरे जायची आपली तयारी असायला हवी. हे सांगण्यासाठी त्यांनी आपल्या मुलाला तो अनुभव घेऊ दिला. अमेरिकेतील किंवा कोणत्याही विद्यापीठाची पदवी जे शिकवणार नाही किंवा समृद्ध करणार नाही त्यापेक्षा जास्त अनुभव त्यांनी आपल्या मुलाला दिला. माणूस पैशांनी मोठा झाला तरी त्याचे पाय जमिनीवर असायला हवेत आणि पैशाची किंमत त्याने कधीच विसरता कामा नये हा आयुष्याचा मूलमंत्र आपल्या मुलाला योग्य वयात शिकविण्यात जगातील सगळ्यात श्रीमंत हिरे व्यापारी असलेले सावजी, कमी पडले नाहीत.

तुमच्याकडे किती पैसा आहे त्यापेक्षा त्या पैशाला तुम्ही किती योग्य रीतीने त्याचे मूल्य जाणता ह्यावर तुम्ही मनाने किती श्रीमंत हे अवलंबून असते. आपल्या प्रत्येक कर्मचाऱ्याला आपल्यासोबत त्यांचा उत्कर्ष करणारे आणि त्याचवेळी आपल्या पोटच्या मुलाकडून सगळी सुखं काढून घेत त्याला जगण्याचा खरा अर्थ शिकविणाऱ्या सावजी ढोलकीया ह्यांना माझा सलाम.

''सर तुम्ही पैशाने श्रीमंत आहातच पण मनाने थोडे जास्तीच श्रीमंत आहात. तुमच्यासारखा लिडर आणि बाप लाभणं हे त्या कर्मचाऱ्यांचे आणि मुलाचे भाग्यच.''

***

**माऊली अशोक पागिरे**
एफ. वाय. बी. कॉम.

# स्त्री चूल आणि मूल



देशातील कोणत्याही कानाकोपऱ्यातील स्त्री 'चूल आणि मूल' या संकल्पनेतून खरोखरचं मुक्त झाली आहे का?

याचं उत्तर ग्रामीण आणि शहरी भागात थोड्याफार फरकाने वेगळे आहे. पुरूष वर्ग, समाज आणि निसर्गाने स्त्रीवर दिलेल्या जबाबदाऱ्यांचा विचार केला तर स्त्री मुक्त झालेली नाही. उलट तिची जबाबदारी आणि तिचे काम वाढले आहे. नोकरी आणि घरची जबाबदारी पार पाडताना पगार नसलेला 'ओव्हर टाईम' स्त्री सध्या करत आहे. मात्र एक आहे, त्याबदल्यात तिला 'आई' या गोड शब्दाचे प्रेम मिळते. पूर्वी स्त्री म्हणजे घर, चूल, मूल इतकच मर्यादित विश्व होते. परंतु हळूहळू हे चित्र बदलले. स्त्री शिकली, सवरली, स्वतःला ओळखायला लागली, उंबरठ्याबाहेर पडली. आज असे एकही क्षेत्र नाही, की जिथे स्त्रीचा वावर नाही. पण या शब्दांनंतर खरी कहाणी सुरू होते. तिचं रूप बदललं खरं; परंतु एक गोष्ट बदलत नाही ती म्हणजे 'चूल आणि मूल.'

स्वतःच करिअर घडविताना 'घर आणि करिअर' अशी दुहेरी भूमिका तिला करावी लागते. थकलेला जीव अंथरूणावर टाकावा, तर दुसऱ्या दिवशीच्या कामाची घौडदौड डोक्यात सुरूच असते. असं हे स्त्रीचं धावपळीचं जगणं. स्त्री आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी झाली पण 'चूल आणि मूल' ही सोनसाखळी काही तिला काढता आलेली नाही. आजच्या स्त्रीची ताकद जबरदस्त वाढली आहे. ती शिक्षण घेते. विविध क्षेत्रात नोकरी करते. पण अजूनही घराची जबाबदारी मात्र तीच उचलते. शिवाय मुलांचा अभ्यास, त्यांच्या भवितव्याची जडण-घडण यांचा भारही स्त्रीने स्वतःवरच घेतला आहे. स्त्रीला आपण घराकडे लक्ष देऊ शकत नाही, याबद्दल अपराधीपणाची भावना असते. या उच्च विचाराला पुरुष साथ देईल का, हा प्रश्नच आहे. जर घर, संसार, नोकरी हे दोघांचे असते, तर जबाबदाऱ्या पार पाडताना दोघांचाही सहभाग हवा. पण तसे घडत नाही. दोघेही नोकरी करून आले की, आई चुलीजवळ अन् पुरूष पेपर वाचतात. असे बऱ्याचवेळा दृष्य पहायला मिळते.

अनेक काळापासून स्त्री आणि पुरूष यांची कामे घर-कुटुंब-समाजामध्ये ठरवून दिली गेली आहेत.

पुरूषाने संरक्षण करावे, अन्न मिळवून द्यावे. स्त्रीने घर व मुले सांभाळावीत; तसेच अन्न शिजवून वाढावे. 'रांधा वाढा उष्टी काढा' ही म्हण खरोखरच त्यातूनच आली आहे. स्त्रीला हे करावेच लागते. स्त्रीवर निसर्गाने सोपविलेले एक नितांत सुंदर काम म्हणजे प्रजनन! अनेक वेदनांमधून जन्माला आलेलं गोंडस बाळ! जन्मांनंतर बाळाशी असणारी स्त्रीची शारिरीक, भावनिक, मानसिक गुंतवणूक इतकी प्रचंड असते की, स्त्री स्वतंत्र झाली असे तिला व समाजाला वाटते. पण तो विचार फक्त भ्रम असतो.

स्त्रीच्या बाबतीत 'रोज मरे त्याला कोण रडे' अशी अवस्था झाली आहे. आठवड्याच्या एकमेव सुट्टीला घरातील सर्वजण मग मुले आणि नवरा दोघांकडून अपेक्षा ठेवल्या जातात. त्या स्त्रीची ती आठवड्याची एकच सुट्टी आहे. याचा विचार केला जात नाही. रोज आठवड्याभरात तेच जेवण खाऊन कंटाळा आलाय... आज सुट्टी आहे! छान काहीतरी खायला वेगळे कर! अशी फर्माईश केली जाते. खरेच स्त्रीची शारिरीक आणि मानसिकदृष्ट्या 'चूल व मूल' यातून आजही सुटका झालेली नाही आणि होऊही शकणार नाही. एवढे सगळे पेलण्याची प्रचंड क्षमता आजच्या स्त्रीमध्ये आहे. हे तिचे स्थान तिने समाजाला दाखवून दिले आहे.

***

**माधुरी संजय पाण्डेय**
टी.वाय. बी.कॉम.



मन जपणे म्हणजे आनंदी राहणे. मन जपणे म्हणजे आत्मविश्वास कमावणे. मन जपणे म्हणजे स्वतःची प्रतिमा उजळत ठेवणे. आपल्या मनाबरोबर इतरांच्या भावनाही जपणं. आपलं शरीर जसं निरोगी रहावं असं प्रत्येकाला वाटत असतं, ते थकू नये म्हणून तसेच ते दीर्घकाळ कार्यरत रहावं म्हणून आपण सारेजण थोडाफार व्यायाम करतो. पण आपण ज्याच्या सुखासाठी आणि आनंदासाठी आपल्या शरीराला हे सर्व करायला सांगतो, त्या मनाची आपण तेवढी काळजी करतो का? शरीर थकलं तरी मन ताजतवानं असेल तर शरीराचा थकवाही जाणवत नाही. शरीराला एखादा मोठा आजार झाला तर मन खंबीर असेल तर तो लवकर बरा होऊ शकतो. एखाद्या आजारातून किंवा एखाद्या जीवघेण्या प्रसंगातून मनाच्या बळावर सुटका करून घेतलेले लोक आपल्या आजुबाजूला सापडतील. माणसानं इतर प्राण्यांहून स्वतःचं वेगळंपण मनाच्या बळावर सिद्ध केलं आहे. पण बऱ्याचदा स्वतःला सिद्ध करताना मनाची शक्ती कमी पडायला लागते. एखाद्या घटनेमुळे किंवा प्रसंगामुळे आपण दुःखी झालो किंवा एखादी गोष्ट माझ्या मनाला लागली की ती माझ्या मनातून काही केल्या जात नाही. किंवा एखाद्या ठिकाणी माझा अपमान झाला, तो मी विसरू शकत नाही. म्हणजेच बाह्य घटनांना किंवा परिस्थितीला जबाबदार धरत आपण आपल्या मनातल्या नैराश्याचं, बैचेनीच समर्थन करीत असतो. खरंतर त्या घटनेबद्दल तुमच्या मनानं बनवलेली मतच तुमच्या मनाच्या या अवस्थेला कारणीभूत असतात. माणूस हा घडलेल्या घटनांनी दुःखी होत नसतो. तर तो घटने-विषयीच्या आपल्या विचाराने दुःखी होत असतो. जीवनात आनंद सर्वांनाच हवा असतो. पण सगळं काही नियोजनाप्रमाणे होत नसतं. पण मनानं मात्र आनंदही गृहीत धरलेला असतो. मात्र ठरल्याप्रमाणे गोष्टी घडल्या नाही कि मग लगेच आपण दुःखी होतो. यावेळी समतोल विचार करण्याची कला मनाला जमली तर आलेल्या प्रसंगातून निभावून जातो. मग अशावेळी पदरी यश आलं काय किंवा अपयश आलं काय; हे सारं समतोलपणे स्वीकारण्याची तयारी असते. माझा भूतकाळही दुःखात गेला, आता माझ्या बाबतीत जे घडतंय तेही मला समाधान देत नाही, मग माझा भविष्यकाळ कसा असेल? असं म्हणणारी माणसं आजुबाजूला कमी नाहीत.

असे नकारात्मक विचार मनात ठेवून बरीच माणसं आपलं आयुष्य कसंतरी ढकलत असतात. पण सकारात्मक दृष्टीकोनातून जर विचार केला तर हा बदल जीवनात सुख, समाधान, आनंद देऊ शकतो. समाधान हे पैशाने विकत घेता येत नाही. ते मानण्यात असतं. मग गोष्ट अगदी छोटी असली तरी चालेल.

माणसाने आपला विचार बदलायला हवा. आपल्या आयुष्यातील सर्वात



# आनंदी मन

चांगला काळ म्हणजे उद्‌भवलेले सगळे प्रश्न हे माझे स्वतःचे आहेत. त्यासाठी मी कुणाला दोष द्यायचं कारण नाही. मला काय साध्य करायचं हे मलाच ठरवावं लागेल, याची जाणिव होण्याचा काळ. आत्मविश्वास हा माणसाच्या आयुष्यातील एक महत्त्वाचा घटक आहे. आपल्याला जेव्हा कळायला लागतं आणि छोट्यामोठ्या प्रसंगात जेव्हा स्वतःला सिद्ध करायची वेळ येते, तेव्हा आपणच आपल्याबद्दल मनात शंका उत्पन्न करतो. आणि इथूनच आपल्या आत्मविश्वासाला धक्का बसायला लागतो. आत्मविश्वास टिकवून ठेवता आला पाहिजे. आपण करत असलेले काम मन लावून त्या कामातला आनंद घेत केले पाहिजे, म्हणजे त्या कामाचं ओझं वाटत नाही. हे काम करणं म्हणजे माझी एक जबाबदारी आहे किंवा मला मिळालेली संधी आहे; अशा विचाराने ते काम केलं गेल पाहिजे. म्हणजे त्यातून आपल्याला आत्मिक समाधानही मिळेल.

यश- अपयश हे आपल्या प्रयत्नांवर अवलंबून असतं. त्यातून चुकून जर अपयश आलं तर ते स्वीकारण्याची तयारीही असायला हवी. अपयश येणं म्हणजे सगळं जीवन अपयशी झालं असं नसतं. पुन्हा नव्याने काही संधी येत असतात. त्या स्वीकारून स्वतःला पुन्हा सिद्ध करण्यास तयार करायला हवं. काही माणसं थोड्याशा यशाने हुरळून जातात व स्वतःला इतरांपेक्षा वेगळं समजून वेगळ्याच जगात वावरायला लागतात. पण त्यामुळे त्यांच्यातील माणूस हरवून जातो. यशसुद्धा समतोलपणे आपल्याला पचवता आले पाहिजे. माणूस त्याच्या भोवतालचा परिसर, समाज हे सगळे घटक माणसाच्या मनावर परिणाम करत असतात. अशावेळी सर्व प्रकारच्या भावना माणूस अनुभवतो.

काहीवेळा काही आनंददायी भावना जगण्याला बळ देतात तर काही नैराश्य, दुःख ,भीती निर्माण करणाऱ्या भावना त्याला कमकुवत करतात. आपण ज्या गोष्टी बदलू शकत नाही त्या गोष्टी स्वीकारून पुढं जाण्याची सवय माणसानं करून घ्यायला हवी. असं केलं तरच माणसाच आयुष्य सोप होईल. तुम्ही कुठेही जा, काहीही करा यशाच्या शिखरावर चढा किंवा अपयशाच्या दरीत पडा; या सर्व परिस्थितीत तुमचं मन स्थिर ठेवावं लागेल. कारण स्थिर मनाचा माणूस जीवनात यशस्वी होत असतो. जग हे दुःखमय आहे असे म्हणून चालणार नाही तर ते अनुभवायला आपलं मन कस आहे आणि ते कसं असायला हवं हे जास्त महत्वाच आहे.

***

**प्रा. डी. जी. ताम्हाणे**
(वाणिज्य विभाग)



# माझ्याकडे वेळ आहे!

पृथ्वीतलावरील प्रत्येक सजीव सृष्टीला एका दिवसाचे २४ तास दिले जातात. प्रत्येक व्यक्ती त्याच्या कामानुसार या वेळेचा उपयोग करतो. काहींना वेळ पुरत नाही तर काहींना वेळच जात नाही; अशी परिस्थिती असते. सर्वप्रथम आपण असे ठरविले पाहिजे की माझ्याकडे वेळ आहे. आता माझ्या डोक्यात कोणकोणत्या योजना आहे, त्या लिहून आवडीचे काम करायला सुरवात करायची. कारण 'तुम्ही कामात गुंतलात की वेळ जातो आणि वेळ बघण्यात गुंतलात की काम जाते.' म्हणून कामावर लक्ष केंद्रित करा.

अनेक लोकांच्या तक्रारी असतात की वेळच मिळत नाही. माझे त्यांना सांगणे आहे की, 'माझ्याकडे वेळ आहे' असे फक्त दोनवेळा मोठ्याने म्हणा, बघा तुम्ही लगेच कामाला लागणार! असं म्हणतात, की आवड असेल तर सवड निर्माण होते. कारण तोंडातून गेलेला शब्द, धनुष्यातून सुटलेला बाण आणि गेलेला वेळ, पुन्हा परत येत नाही. मला दिवसभरात मिळालेले २४ तास मी कसे आणि कुठे घालवीन याची योजना करावी. योजना करतांना आपल्या लक्षात येते की, आपल्याकडे वेळच वेळ आहे. कामाची घाई न करता मन लावून काम करा म्हणजे त्या कामापासून समाधान मिळेल. नाही तर काम लवकर उरकून उरलेल्या वेळेत आपण नुसतेच रिकामे राहतो; याला काही अर्थ नाही.

Time म्हणजे This is Man Energy म्हणजेच या शक्तीचा आपण कसा वापर करायचा हे आपण ठरवायचे. शेवटी एकच सांगतो, वेळेची किंमत त्या वर्तमानपत्राला विचारा... जे सकाळी चार रुपयाला मिळते आणि संध्याकाळी तेच वर्तमानपत्र चार रूपये किलोने विकले जाते.

***

**प्रा. दिलीप श्रीराम बारी**
(सहाय्यक प्राध्यापक) वाणिज्य विभाग

# समाधानाचा मूलमंत्र

आजच्या काळात समाधान हे जणू हरवतच चाललं आहे. कारण माणूस भौतिक सुखाच्या आणि पैशांच्या मागे धावत आहे. परंतु जगण्याचे खरे मर्म म्हणजे समाधान! ते पैसा आणि सुखाच्या पलिकडचं असतं.

समाधानाचं बीज हे मनाच्या मातीत पेरायला पाहिजे. खरी गंमत म्हणजे आपलं मन हे आपला मित्र आणि शत्रू देखील असतो.

मग हे समाधान आपल्या पासून दूर का? आणि मग ते येत तरी कोठून? सुख कसे मिळवावे?

मुळात सुख आणि समाधान ह्या भिन्न कल्पना आहेत.

आपण समाधानापासून दूर आहोत, कारण आपण सतत 'लोक काय म्हणतील' याचा विचार करतो. अगदी कोणतंही छोट-मोठं काम करताना आधी लोकांचा विचार मनात येतो. परंतु जर निरागस आयुष्य जगायचं असेल तर लोक काय म्हणतील.... या विचारावर पाणी सोडायलाच हवे!

दुसरा मुद्दा म्हणजे, आपण नेहमी इतरांना व स्वतःला तुलनेच्या तराजूतून तोलत असतो, सतत तुलना, भेदभाव! जसे प्रत्येक child तसेच Every person is special person हे आपण विसरतच चाललोय.

मुळात माणूस हा देव नसून प्रत्येक माणसातच देव आहे. मग आपण इतरांशी तुलना का करावी? ह्या दुःखामुळेच मग जीवघेणी स्पर्धा निर्माण होते. म्हणूनच, इतरांशी तुलना न करता आपण 'बकेट लिस्ट' म्हणजेच स्वतःची (Wish list) पूर्ण करायला हवी. आपले छंद, आवडी निवडी जोपासायला हवेत. कारण, आपण आपले छंद, अपेक्षा पूर्ण नाही करणार तर इतर कोण करणार ?

मग, समाधान हवं असेल तर...

सुखाच्या मागे न धावता निरागस आयुष्य जगावं व लहान क्षणात समाधानाने रहावे. म्हणून कस्तुरी मृगासारखं जीव पणाला लावून सुगंधा (सुखामागे) धावू नये. कारण, ह्यात आपलाच घात ठरलेला आहे.

सुख हे मृगजळ असून समाधान हे कल्पवृक्ष आहे. हे आपल्या मनाने स्वीकारायला हवं!

***

**उमेश महादू ढमाले**
एफ.वाय., बी.सी.ए.

# माझी... मराठी

प्राथमिक शिक्षण मराठी मातृभाषेतूनच असावं, असं माझ स्पष्ट मत आहे. प्राथमिक शाळेची मुलं दहा वर्षापर्यंतची असतात. पहिली पाच वर्षे तर शिशू म्हणून घरातच जातात. नंतरच्या पाच वर्षात मराठीतून शिक्षण असेल तर मुलांचे मराठी खूपच आकाराला येईल. पूर्वी आमचं शिक्षण मराठीतूनच झालं, नंतर पाचवी म्हणजे इंग्रजी पहिली म्हणत, अशी इंग्रजी सातवी म्हणजे मॅट्रीक म्हणत.

लहान वयात मराठी व जाणत्या वयात इंग्रजी शिकल्यामुळे आमच्या पिढीच्या दोन्ही भाषा चांगल्या झाल्या. मोठमोठे लेखक त्यामुळे निर्माण झाले. उभ्या जगात त्यांचे काही अडलं नाही. इंग्रजी भाषा मराठीच्या मानाने सोपी आहे. पहिलीपासून इंग्रजी ठेवायचीच झाल्यास ऐच्छिक विषय म्हणून ठेवावी. त्यात कमी गुण मिळाले तरी प्रगतिपुस्तकावर फार परिणाम होऊ देऊ नये.

लांब दूरवरच्या खेड्यापाड्यातून शिकणाऱ्या मुलांना आपली भाषा येणं हे जास्त महत्वाचं आहे. त्यातल्या नापासांचे प्रमाण वाढले तर शाळेतली मुलांची हजेरी नक्कीच रोडावेल. वर्ग ओस पडतील. मात्र मराठीत शिक्षण दिल्यास निदान चौथीपर्यंत तरी दूर खेड्यापाड्यातील मुलं-मुली आनंदाने शिकतील. तेवढं जरी झालं तरी त्यांना आपल्या आयुष्यात उभं रहायला निश्चित मदत करील.

मुळात आपल्याला इंग्रजी बोलता येत नाही हा न्यूनगंड मनातून काढून टाका. तुम्ही टि.व्ही. वर रशियन, चिनी, इटालियन वगैरे खेळाडू आपल्या मातृभाषेतूनच बोलतात, हे तर ऐकलचं असेल, म्हणून तुम्ही तुमच्या मातृभाषेतूनच बोलायला हवं! म्हणजे आत्मविश्वासाने बोलता येईल.

आपला भारत आता स्वतंत्र, स्वाभिमानी देश आहे. आपल्या स्वातंत्र्याला पाच दशकं उलटून गेलेली आहेत. तेव्हा एवढा तरी स्व-भाषाभिमान आपण मनोमन बाळगायला हवाच आहे! ते फार फार जरूरीचे आहे, अस माझं स्पष्ट मत आहे. तुम्ही तो अभिमान मनोमनी बाळगाल तर पुढील ओळीतलं सौंदर्य देखील तुम्हाला जाणवेल.

**मराठी असे आमची मायबोली ।**
**जरी आज ती राजभाषा नसे ।।**
**नसो आज ऐश्वर्य या माऊलीला ।**
**यशाची पुढे दिव्य आशा असे ।।**

***

**पुनम चंद्रकांत म्हस्के**
टी.वाय., बी.कॉम.



# तुलनेत तोलताना...

तुलना.... हा शब्द आपल्याला तसा नवीन नाही. कारण खरं म्हणजे तुलना हा आजच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनत चालला आहे. येथे प्रत्येकजण दुसऱ्याकडून तराजूत तोलला जातो. आपण तुलनेशिवाय कोणालाही जणू पाहूच शकत नाही.

याच तुलनेच्या सवयीतून आपण एखाद्या व्यक्तिला आपल्या मनात नको इतकं वर उठवतो नाहीतर स्वतःच्या तुलनेत खूप खाली पाडतो. परंतु हे दोन्ही खूप घातक आहे, हे आपण समजून घेतलं पाहिजे.

उदाहरणच द्यायचं तर, गुलाबाइतका सुंदर सुगंध दुसऱ्या फुलाला नाही. मात्र फुलांचा राजा मात्र कमळ! सौंदर्याचं प्रतिक!! तरीदेखील आपण त्याची तुलना गुलाबाशी किंवा इतर फुलांशी करतो. मात्र गुलाबाला सुगंध आहे पण त्याला काटेदेखील आहेत. हे विसरुन चालेल का? तसेच कमळ हे फूल सुंदर पण ते उगवते मात्र चिखलातच !

मुळात ह्यांच्याप्रमाणे प्रत्येक माणसात चांगले किंवा वाईट गुण असतात परंतु, आपण त्यांची सतत तुलना करू नये, वाईट दोष विसरून चांगले गुण पहावेत! खरं तर इतरांशी तुलना केल्याने द्वेष, मत्सर, क्रोध यांचा उगम होतो आणि सत्कर्म व संस्कार यांचा नाश होतो. माणूस अधोगतीला जातो. ह्या मागचं शास्त्रीय कारण असं की- जेव्हा एखाद्या व्यक्तिची सतत तुलना होते तेव्हा त्याच्या back of the mind वर परिणाम होतो व तो द्वेष, मत्सर करू लागतो. तुलना ही सकारात्मकतेने हाताळल्यास त्यातून प्रगतीदेखील साधता येते. परंतु नकारात्मक तुलनेचा वाईट प्रभाव पडतो. म्हणूनच ह्या जगात तुलनेत तोलताना स्वतःला मात्र अलिप्त व शांत रहायला हवे. कारण - प्रतिबंधापेक्षा काळजी बरी!

***

**सुरज जयवंत कुलकर्णी**
एफ.वाय., बी.सी.ए.



आई माझी मायेचा सागर, दिला तिने जीवनाला आकार.

आईवाचून माणसाचे जीवन व्यर्थ आहे. लहानपणापासून आईच सर्व काही करत असते. जन्मदात्या विधात्यालाही आईनेच जन्म दिला आहे. चालता चालता पायाला ठेच लागली की आईचेच नाव आपल्या तोंडी येते. आईला खूप महत्त्वाचे स्थान आहे. सर्व काही मिळू शकते पण एकदा गेलेली आई परत मिळू शकत नाही.

लहानपणी माझी आई शेताला जायची आणि मी आपला शाळेत असायचो. पण घरी आल्यावर घरी आई दिसत नसल्यास मला कसेतरी वाटत असे. हे सर्व जग मिथ्या वाटत असे. मी शाळेत असलो तरी माझी आई माझ्यासाठी म्हणून शेजारच्या काकूंकडे घराची चावी ठेवून जायची. त्या काकूला माझ्या जेवणाची काळजी घ्यायला सांगायची. म्हणजे बघा, आईची माया ही किती वेडी असते आणि मी घरात एकटाच असल्यास जेवता-जेवता आईची आठवण आली की मनात धस्स असं व्हायचं. डोळे भरून यायचे. मी आपला रडत बसायचो. शाळेची घंटा वाजली की लगेच शाळेत जायचो. आपल्या मित्रासोबत अभ्यासात रमत होतो. असाच काही वेळ शाळेत निघून गेल्यावर जवळ जवळ पाच वाजल्यानंतर मी तसाच शाळेचं दप्तर घेऊन घरी यायचो. जाता जाता दिवस पार सहा जवळ गेल्यानंतर शेतातून गावातील माणसे येत असतांना बघायची. त्यांच्याजवळ जायचं आणि म्हणायचं, 'काकू, माझी आई आली का हो?' त्या नाही म्हटल्यावर त्यांनाच म्हणायचं, 'कसं काय आली नसलं हो? किती वेळ झाला. अजून कसं काय आली नाही?' अशी वाटच पाहायची.

आता येईल मग येईल असं म्हणता म्हणता उशीरा आई आली कि मग मनामध्ये आनंद दाटून येत असे. ती माझ्यासाठी काही ना काही तरी खायला देखील घेऊन येत असे. रानातली बोरं, चवळीच्या शेंगा, तुरीच्या शेंगा ती माझ्यासाठीच मुद्दाम घेऊन येत असे. ते काढून देण्याआधी मीच म्हणायचो, 'आई, मला काही तरी आणलं का नाही?' आई म्हणायची, 'काय रे, बाळ्या तुझ्यासाठी नाही तर कोणासाठी आणीन?' असं म्हणत असायची.

अशी ही आई मायेचा सागर आहे. आई ही आपल्या मुलाच्या सुखासाठी सर्व काही करते. ती राब राब राबत असते. माझी आई माझ्यासाठी खूप कष्ट करते. शेतात गेलं आणि इकडं तिकडं या बोरीला त्या बोरीला गेलं की, आई सारखा आवाज देते. 'आरे ऐ बाळ्या'!! मी कायम जवळ असावं, असं तिला वाटत असत. सकाळी उठल्यापासून ते रात्रीपर्यंत सर्व काही कामे आईच करत असते. आंघोळीला पाणी देखील तीच काढून देत असते. जेवण देखील तीच बनवत असते. तिच्या हातांनी बनवलेल्या चहाची चव तर वेगळीच असते.

आई बापाच्या खांद्याला खांदा लावून कष्ट करत असते. तिला



# मायेचा सागर... आई

फक्त एकच काळजी असते की, आपल्या मुलांचं कसं होणार? आपली मूलं चांगली शिकावी; त्यांना आपल्यासारखंच कष्ट किंवा त्रास होऊ नये म्हणून ती खूप कष्ट करते. तसेच आपल्या मुलीला चांगल घर मिळावं म्हणून त्याचीही काळजी करते. तिच्या कपाळी काय... दिवसरात्र कष्टच लिहिलेले असतात कि काय? इतके काबाडकष्ट ती करते.

पैशाने वस्तू मिळेल मात्र आई मिळणार नाही. पैशाने गाडी मिळेल मात्र आईचं प्रेम मिळणार नाही. सर्व काही मिळेल पण एकदा गेलेली आई मिळत नाही.

'स्वामी तिन्ही जगाचा, आईविना भिकारी' असे काव्य केलेले आहे. 'ये ग ये ग विठाबाई, माझे पंढरीचे आई।' तुकाराम महाराजांनी देखील विठ्ठलाला आई म्हटले आहे, मुलगा आजारी असला कि त्याला ती दवाखान्यात न्यायला लावते. हॉस्पीटलमध्ये डॉक्टरांनी गोळ्या औषधं दिल्यावर त्यांना अजून एक दोन जास्तीचे औषध द्यायला लावून 'माझ्या लेकराचा आजार बरा व्हावा' असं तिला वाटत असतं. गोळ्या घेतल्या कि नाही? औषध घेतलं की नाही? असं ती वारंवार विचारपूस करते. औषध घेत नसल्यास घ्यायला लावते. आई ही आपल्या सुख दुःखात सहभागी होते. आईसारखं प्रेम कोणीही देऊ शकत नाही.

भगवान कृष्णाला आईनेच जन्म दिला, भगवान रामाला आईनेच जन्म दिला. आईचे खूप उपकार आहेत, सर्व काही मिळेल मात्र आई मिळत नाही, मुलाला घालायला पायात चप्पल नसेल तर ती रोजानं काम करते व पैसे मिळवून चप्पल घेऊन देते. एखाद्या वेळी घरात जेवण जर कमी पडत असेल तर आई स्वतः जेवत नाही. अगोदर इतरांच जेवण झाल्यावर मग, काही उरेल तेच खाते. कमी पडलं तर ती आपल्या मुलांसाठी आधी ठेवते, स्वतः जेवत नाही. तिला मात्र जेवायला शिल्लक आहे किंवा नाही, याची मात्र कोणीच काळजी घेत नाही. तिच्या केलेल्या उपकारांची फेड कोणीच करू शकत नाही. आपल्या मुलीच्या लग्नाला पैसे जमा व्हावेत म्हणून तसेच आपल्या मुलाच्या शिक्षणाला पैसे लागतील म्हणून ती एक एक पैसा जमा करते. तिला आपल्या मुलांची काळजी असते आणि कुटूंबाची देखील काळजी असते. जेव्हा आई नसेल तेव्हाच आईची किंमत कळते.

ज्याला आई नाही त्याला विचारून बघा, त्याला आईची किंमत कळलेली असेल.

***

**अर्जुन उल्हासराव आळसे**
एस्.वाय., बी.कॉम.

# बाप माणूस

शाळेच्या पहिल्याच दिवशी वर्गात सरांचं आगमन झालं अन् ओळखीचं सत्र सुरू झालं. तुमचं नाव काय, तुमचं गाव काय, अन् तुमचे बाबा काय करतात... असे प्रश्न विचारण्यात आले.
कोणाचे बाबा डॉक्टर, इंजिनिअर तर कुणाचे बाबा वकील, ऑफिसर! माझा नंबर येताच, मी उभा राहिलो अन् पटकन सांगितले...
'सर, माझे बाबा शेतकरी आहेत.'
मी, असे म्हणताच सारा वर्ग हसायला लागला.
मला त्यांचा राग आला.
मी म्हटलं, 'सर, मी असं नाही म्हणत की, या साऱ्यांचा धंदा छोटा आहे. पण माझा बाप या साऱ्यांहून मोठा आहे.
हाडाची काडं करून
रातदिन राबत असतो.
पण तो राबतो सर, म्हणून तर तुम्ही, आम्ही जगतो नं?
माणुसकीच्या गावामध्ये...??
सर, माणुसकीच्या गावामध्ये
अजूनही त्याचीच वस्ती आहे.
अन् खर सांगतो सर,
माझ्या बापाची मरनासंग दोस्ती आहे.
फाटके-तुटके कपडे....
सर... फाटके-तुटके कपडे, तो अजूनही अंगावर लेतो
पण तुमच्या महागड्या कपड्यालाही
मला त्याच्याच घामाचा वास येतो.
सर.... पाऊस येईल न येईल... काहीच माहीत नसताना
हजारो रूपये मातीत टाकतो.
खरंतर माझा बाप सर...
मातीसंग जुगारच खेळतो!
जिंकण्यासाठी इथे तर सारेच जुगार खेळतात.
पण माझा बाप, जगण्यासाठी जुगार खेळतो,
अन जगण्याच्या जुगारात तो नेहमीच हरतो.
टाकून पाहा सर, कधी मातीत ५-५० हजार! तेवाच कळेल तुमाला जगण्याचा जुगार!!
पण जाऊ द्याना सर....
बंगल्यामधी राहणारे तुम्ही! तुम्हाला त्याची काय जाण? पण त्याच्याच कुडाच्या घरामध्ये तुमच्या बंगल्याची शान! आणि म्हणून म्हणतो सर...
अभिमान आहे मला, मी शेतकरी पुत्र असल्याचा अन् अभिमान आहे मला माझा बाप शेतकरी असल्याचा.

***

**प्रा. डॉ. रणजित कदम**
(वाणिज्य विभाग प्रमुख)

# गनिमी कावा

गनिमी कावा.... हा शब्द वाचल्यानंतर पहिल्यांदा जी छबी उभी राहते किंवा ज्या युगपुरूषाचे दर्शन झालं ते म्हणजे केवळ महाराष्ट्राचे नव्हे, तर संपूर्ण जगावरती आजपर्यंत, आज ३०० वर्षे होऊन गेले असतानाही ज्यांचा विचार आपल्याला ध्येय प्राप्तीपर्यंत नेतात असे युगप्रवर्तक छत्रपती शिवाजी महाराज ज्यांचा उल्लेख समर्थ रामदासांनी आपल्या श्लोकात केला.

**शिवरायांचे आठवावे रूप, शिवरायांचा आठवावा प्रताप**
**शिवरायांचा आठवावा साक्षेप, भूमंडळी....**
**शिवरायांचे कैसे चालणे, शिवरायांचे कैसे बोलणे**
**शिवरायांचे सलगी देणे, कैसे असे....**

आता गनिमी कावा शब्द शिवरायांच्या युद्धनितीतला एक युद्ध प्रकार आहे. ज्या युद्धनितीमुळे शिवरायांनी शून्यातून विश्वाला गवसणी घातली, स्वराज्याला सुखाची झालर घातली. आपण इतिहास वाचतो पण आत्मसात करत नाही. आपल्या आयुष्यात येणाऱ्या चढ-उतारांवर आपण कधीही गनिमी कावा करत नाही. शिवरायांनी स्वराज्य प्राप्तीसाठी गनिमी कावा केला. मला असं आवर्जून वाटत आज आपण या इंटरनेटच्या काळात अयोग्य दिशेने वाहत चाललो आहे. वाहत्या पाण्याच्या प्रवाहात उलट पोहण्याची ताकद फक्त माशाच्या जातीत असते. आपण वाहतो ते प्रवाहा-प्रमाणे. पण आताचा वाहणारा मोसमी प्रवाह कोणत्या दिशेने वाहतो ते पाहूनच आपण प्रवाहाच्या बरोबर वाहत जावे. पण तोच जर प्रवाह बरोबर नसेल तर प्रवाहाच्या उलटे जाण्याची इच्छाशक्ती, आत्मबळ असलेच पाहिजे. अखंड प्रवाहाप्रमाणे वाहणारी मुस्लिम राजवट छत्रपती शिवरायांनी मावळ्यांच्या सोबतीने प्रवाहाच्या विरूध्द जाण्याची इच्छाशक्ती निर्माण केली आणि त्यातूनच हे राज्य व्हावे ही श्रींची इच्छा म्हणून स्वराज्य निर्माण केले.

आपण आजच्या काळात भरकटत चाललो असताना आपल्या शरीरावर जे मन राज्य करत, त्याच्यावरही गनिमी काव्याच्या युध्दनीतीने जरब बसवली पाहिजे व एक आदर्श युवक बनले पाहिजे. ही काळाची गरज आहे. स्वतः स्वतःचा विचार करून आजच्या या मोहमायारूपी जीवनावर योग्य प्रकारचा गनिमी कावा केला पाहिजे. पहिल्या पासून ते आत्तापर्यंतच्या लेखनात आपण गनिमी कावा हा विषय घेतला पण गनिमी कावा म्हणजे काय तर संकटाला आपल्या येण्याची चाहूल लागण्याअगोदर त्या संकटावर मात करणे म्हणजे गनिमी कावा. म्हणूनच जीवनातील चढ-उतारावर गनिमी काव्याद्वारे मात करून आपण आपले आयुष्य जगले पाहिजे. कारण आयुष्य सुंदर आहे पण ते सुंदर बनविण्याची इच्छाशक्ती आपल्यात असली पाहिजे. जाता जाता एवढंच की, मनाने इतके चांगले रहा की विश्वासघात करणारा तुमच्याजवळ येण्यासाठी रडला पाहिजे.

***

**आकाश अर्जुन भडगावी**
एस.वाय., बी.कॉम.



# आधुनिक तंत्रज्ञान शाप की वरदान

काय आश्चर्य आहे, एकीकडे आम्ही चंद्रावर पाऊल ठेवतो आणि दुसरीकडे विचारतो, विज्ञान - शाप की वरदान ! विज्ञान शक्ती आहे. ती कशी वापरायची हे आपणच ठरवायला हवं. केवळ विज्ञानामुळे आज मानव इतर प्राण्यांहून श्रेष्ठ ठरला आहे. फोनचा शोध लागल्यामुळे घरात बसल्याबसल्या गावातल्यापासून ते परदेशातील व्यक्तींशी आपण सहज बोलू शकतो, त्यांना पाहू शकतो. गणक यंत्राद्वारे मोठीमोठी गणिते सहजरित्या सोडवू शकतो. पृथ्वीची कक्षा ओलांडून आपल्याला चंद्र, मंगळ, शुक्र या सर्व ग्रहांविषयी माहिती मिळविता येते.

विज्ञानाने अनेक रोगांवर मात करून दुर्लभ अशा रोगांना पळवून लावले आणि मानवाच्या आयुष्याची मर्यादा वाढविली. मानवाची आदिकालीन अवस्था आणि आजच्या २१व्या शतकातील अवस्था यात जे अंतर दिसून येते ते अंतर म्हणजे मानवाने प्रगतीच्या दिशेने घेतलेली झेपच आहे. सकाळी उठल्यापासून ते रात्री झोपेपर्यंत विज्ञान आपल्याला फार मदत करते. केवळ मनोरंजनाकरिता घेतलेल्या दूरदर्शन संचावर संपूर्ण जग पाहू शकतो, जगाची ओळख करून घेऊ शकतो. क्ष-किरण यंत्राच्या सहाय्याने आम्ही आमच्या शरीरातील आतील भागाची पाहणी सुद्धा करू शकतो.

कृषी क्षेत्रातसुद्धा विज्ञानाने नवनवीन शोध लावल्यामुळे हरितक्रांती घडून आली आहे. शेतीच्या उत्पादनात वाढ झाली आहे. स्वयंपाकघर ते अवकाशापर्यंत विज्ञानाने प्रगती केली आहे. विज्ञानाने मानवाला अतिशय सुखी बनवले आहे. विज्ञानामुळे नवनवीन तंत्राचा शोध लागून मानव अतिशय सुखी बनला आहे.

असे असले तरी विज्ञानाच्या या प्रगतीमागे सामान्य माणसांचे फार मोठे नुकसानही झालेले आहे. संगणकाच्या प्रस्थापनेमुळे आज घरी कोणतेही कार्य संगणकीकृत होत असले तरी एका संगणकामुळे दहा लोक बेरोजगारीच्या खाईत लोटले जाऊ लागले आहे. त्यामुळे विज्ञानाने केलेली प्रगती कुठेतरी शापही ठरते.


मानवी जीवनात संगणक हा विज्ञानाने मानवाला दिलेला कल्पवृक्ष होय, तो इंटरनेटशी जोडला की सारे विश्व तुमच्यापुढे प्रकट होते. आधुनिक युग हे यांत्रिक युग आहे. प्राचीन काळी यंत्राच्या अभावी मानवाला यंत्राप्रमाणे श्रम करावे लागत होते. विकासाचा ओघ सुरू झाला प्रत्येक क्षेत्र यंत्रांनी व्याप्त केले. व्यवसाय व्यापाराचे क्षेत्रसुद्धा यंत्राच्या मदतीने सुरू झाले. उत्पादन प्रक्रियेतून तर सामान्य ग्राहकांपर्यंत वस्तू पोहोचविण्याकरीता नव्हे तर हिशोबाचे, कार्यही यंत्र करू लागलेत. विकास हा चहूबाजूने होत गेला.

संगणकास लागणारी माहिती तयार करण्यासाठी खास शिक्षण घेतलेली माणसे लागतात. या कामाला सॉफ्टवेअर तयार करणे असे म्हणतात. असे सॉफ्टवेअर बनवून परदेशी पाठविल्यामुळे भारताला परकीय चलन भरपूर प्रमाणात मिळेल. भारतात अशा हुशार तरूणांची कमतरता नाही. यंत्रमानव हा देखील विज्ञानाचा चमत्कार आहे. गरज ही शोधाची जननी आहे. माणसाची प्रवृत्ती मुळातच शोधक आहे. गेल्या अनेक दिवसापासून जगात कोठे ना कोठे विविध प्रकारचे शोध लावले जात आहेत.

साहित्य आणि विज्ञान मानवी जीवनात परिवर्तन घडवून आणणाऱ्या शक्ती आहेत. विनोबा भावे म्हणतात त्या अशा पद्धतीने मानवी आयुष्यात साहित्याचे व विज्ञानाचे फार महत्व आहे. परंतु या सर्व गोष्टींमुळे मानवी आयुष्य सुखी तेवढेच गुंतागुंतीचे देखील झाले आहे. म्हणूनच प्रश्न निर्माण होतो की, झालेल्या तंत्रज्ञानाचा हा बदल मानवी आयुष्यात शाप आहे की वरदान? या प्रश्नाचे उत्तर मिळविणे फारच कठीण आहे.

✻✻✻

**अश्विनी बाळकृष्ण वाघ**
टी.वाय., बी.ए.



# भारतीय लोकशाहीतील अडसर

विश्वातील बऱ्याच देशांनी लोकशाही शासन पद्धतीचा स्वीकार केलेला आहे. या शासन पद्धतीत खऱ्या अर्थाने सर्वच जनतेचे प्रतिनिधीत्व किंवा त्यांचा सहभाग असतो. अमेरिकेचे पहिले राष्ट्राध्यक्ष अब्राहम लिंकन यांनी लोकशाहीची सत्यतादर्शक अशी व्याख्या खालीलप्रमाणे केली आहे ती अशी, 'लोकांनी लोकांसाठी लोकांकडून चालविलेले राज्य म्हणजे लोकशाही होय.' परंतु आज भारतीय लोकशाहीला दोन प्रमुख अडसर निर्माण झालेले दिसून येतात ते म्हणजे धर्म आणि जात होय.

प्राचीन काळापासून भारतात अनेक धर्माचे प्राबल्य आहे. प्रत्येक धर्माच्या धर्मसंस्थापकांनी धर्मात मानवाच्या प्रगतीचाच मंत्र सांगितलेला आहे. प्रत्येक धर्माची विचारधारा ही मानवाला वाईट वर्तनापासून रोखण्यासाठी तयार झालेली आहे. धर्म म्हणजे चांगले आचरण करण्याचे शास्त्र आहे. धर्मांमुळे मनुष्याचे चारित्र शुद्ध होते. धर्माच्या अभ्यासामुळे सत्य-असत्य, खरे-खोटे यांची ओळख होते. परंतु आज धर्माचे अनुयायी धर्मतत्त्वाचा आपापल्या परीने अर्थ लावून लोकांना कर्मकांडाकडे वळवण्याचा प्रयत्न करतांना दिसून येत आहेत. हाच मार्ग राजकारणातील व्यक्तींनी सुद्धा अवलंबिलेला दिसून येतो. धर्माच्या बाबत अपशब्द कोणी काढण्याचा प्रयत्न केला तर लगेच व्यक्तीचा अहंकार जागृत होतो. ही सर्व खेळी राजकारणाचा परिपाक म्हणावा लागेल.


अशा पध्दतीने राजकारणातील पुढारी धर्माचा वापर सर्वसामान्य लोकांची डोके भडकविण्यासाठी करतात. धर्माचा आधार घेऊन जातीय दंगली, जाळपोळ व मोर्चे यांचे आयोजन केले जाते. लोकशाहीतील राजकीय पक्षाची निर्मिती करतांनासुद्धा जात, धर्म, या घटकांची वापर केला जातो. पक्षाचे तिकिट वाटपापासून सत्ता स्थापनेच्या प्रक्रियेपर्यंत धर्म व जातीचा वापर केला जातो. खऱ्या अर्थाने राजकारण हे जात व धर्म विरहित निर्माण झाले तर भारतीय लोकशाहीतील राजकारण हे स्वच्छ आरशासारखे दिसेल.

भारतीय लोकशाही शासन पद्धतीतील







दुसरा महत्वपूर्ण अडसर म्हणजे जात होय. 'जी कधीच जात नाही ती म्हणजे जात' अशी व्याख्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केली. जात ही भारतीय समाज-व्यवस्थेला लागलेला कलंक आहे. जातीची उतरंड आस्तित्वात असल्यामुळे समाजात श्रेष्ठ- कनिष्ठतेची भावना डोके वर काढतांना दिसते.

ज्याप्रमाणे जुन्या काळातील स्त्रियांच्या शरीरावरील गोंदण मृत शरीर दहन केल्याशिवाय जात नाही, त्याचप्रमाणे जात हा कलंक समाज व्यवस्थेतून बहिष्कृत होऊ शकत नाही. जात हा कलंक समाजव्यवस्थेतून बाहेर काढण्यासाठी महात्मा फुले, संत रविदास, संत कबीर व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या विचार साहित्यातून प्रयत्न केला. परंतु ही मानवनिर्मित विषमता आजसुद्धा नष्ट झालेली दिसत नाही.

लोकशाही राजकारणामध्ये सुद्धा या घटकाला महत्त्व दिले जाते. पक्षाच्या बांधणीपासून सत्ता स्थापनेच्या संपूर्ण प्रक्रियेत हा घटक महत्त्वपूर्ण मानला जातो. जातीच्या आधारावर दंगली, जाळपोळ व मोर्चे निघतांना दिसतात. म्हणून आज जात व धर्म हे कलंक पुसून स्वच्छ चारित्र्याने राजकारणात पाऊल टाकले तर खऱ्या अर्थाने लोकशाहीतील राजकारणाचे चित्र राजहंसासारखे सुरेख व सुंदर दिसेल.

धर्म व जात यांचा घनिष्ट संबंध अनंत काळापासून राजकारणात आलेला दिसून येतो. राजकारणातील काही तत्वे लोकांच्या माथी मारायची असतील तर त्याला धर्म व जातीचा मुलामा दिला जातो. ती तत्वे लोक सहजरित्या स्वीकारतात. राजकारणात मतांच्या मागणीसाठी जात व धर्म हे घटक पुढे करून सर्वसामान्य जनतेचे लाख-मोलाचे 'मत' पदरात पाडून घेतले जाते. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणतात की, राजा हा राजाचा पोटातून न जन्मता मतपेटीतून उदयास आला पाहिजे. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे हे स्वप्न अपयशी ठरले.

राजकारणी धर्म, भाषा व जात या मुद्यांना नेहमीच खतपाणी घालतांना दिसतात. प्रत्येक सभेत धर्म, भाषा व जात या मुद्यांना महत्वाचे स्थान देऊन स्वतःच्या स्वार्थाची पोळी भाजून घेतात. खऱ्या अर्थाने आज लोकशाहीतील राजकारण धर्म, भाषा व जात विरहित निर्माण होणे आवश्यक आहे. देशातील बेकारी, दारिद्रय व मुलभूत गरजा लक्षात घेऊन राजकारणाची पायाभरणी झाली तर राजकारण हे शुद्ध व शुभ असेल. मी भारतीय व भारतातील सर्व लोक माझे बांधव आहेत ही प्रतिज्ञा नजरेसमोर ठेवून वर्तन केले तर स्वातंत्र्य, समता, व बंधुत्व या मूल्यांची नव्याने निर्मिती करण्याची गरज नाही एवढीच अपेक्षा आहे.

***

**प्रा. माणिक कसाब**
(राज्यशास्त्र विभाग प्रमुख)

# बाप



आई आणि बाप म्हणजे आपले ते देव, गुरु असतात. ते आपल्याला लहान असताना बोटाला धरून चालवायला शिकवतात. आपल्याला जेव्हा काहीच कळत नसतं तेव्हा ते सर्व काही शिकवत असतात त्यालाच वडील म्हणतात. वडील ज्यांचे हृदय गुलाबासारखे असते, घराचा पाया असतो. जेव्हा पाया खचतो ना तेव्हा कोसळते घर. आपला बाप हा युध्दामध्ये लढायला जाणाऱ्या तलवार व ढालीप्रमाणे असतो; जो इतरांचे सर्व घाव म्हणजे आपल्या मुलाचे, मुलींचे, बायकोचे आपल्या मनोमन सहन करीत असतो. ते कधीच कुणाला कळू देत नसतो कि माझ्यावर किती दुःख आहे.

रात्री घरात सर्वजण सुखाने झोपतात, याचे कारण काय ? जेव्हा आपला बाप घराबाहेर रात्रभर जागा राहतो, तेव्हाच आपण घरामध्ये सुखाने झोप घेऊ शकतो. मुलांनो..... यालाच म्हणतात बाबा!

जेव्हा आपल्या मुलांच्या दुःखात किंवा तो आजारी पडतो तेव्हा आपला बापच म्हणत असतो कि, 'चल रे बाबा, तुला मी दवाखान्यात नेतो.' बापाजवळ पैसे नसतानासुध्दा एखाद्याकडून तो पैसे घेतो व मुलाला दवाखान्यात नेतो. त्यालाच म्हणतात बाप! मुलाला दहावीत किंवा बारावीत जर चांगली टक्केवारी मिळाली तर बापाकडे पैसे नसतानासुध्दा दुकानातून उधार पेढे तो घेऊन येतो आणि सर्वांना आनंदाने सांगतो कि, 'माझा मुलगा पास झाला.' यालाच म्हणतात बापाच प्रेम! आईचं महत्व तर कुणीही सांगत असते पण कधी कधी बापाकडे पण पाहिले पाहिजे.

बाबा, तुझ्या खरबुड्या हातांना उपमा कसलीच मिळाली नाही अन् तुझी पडद्यामागची भूमिका मला कधीच कळली नाही, आज कळते तेव्हा योगायोग कसा घडायचा? मी उशीरा आलो कि नेमका तूच कसा दार उघडायचास! हे जग बघ ना, तुझ प्रेम कसं वरवर पाहून गेलं! पण मला माफ कर ना बाबा, तुझ्यावर लिहायच राहून गेल रे!

बनियनला पडलेली छिद्र आणि वस्त्ऱ्याने ओरबाडलेली दाढी. आता कळलं मला की कशी माझ्या नशिबात गाडी, कळलचं नाही. तुझं आयुष्य किती अवघड होतं. कारण घामात अश्रू लपविण्याची तुझी आयडिया महाझकास होती. परिवाराच्या दिव्यासह जळताना तेल पण कस झिरपून गेलं. पण माफ कर ना , बाबा तुझ्यावर लिहायच राहून गेलं.

**बाबा**
**लंगड्याची काठी झालास,**
**वासराची गाय झालास,**
**आंधळ्याचा डोळा झालास,**
**मुक्याचा आवाज झालास,**
**आज कळलं मला कि**
**जन्मल्यावर तुझं नाव**
**का मला मिळालं?**
**पण माफ कर ना बाबा**
**तुला समजायला आयुष्य**
**कमी पडलं रे!**

***

**सोनाजी पांडुरंग टिळेकर**
एस.वाय., बी.कॉम.



# प्रतिबिंब

फार वर्षापूर्वीची गोष्ट आहे. एक राणी आपले ओले केस सुकवण्यासाठी राजवाड्याच्या छतावर गेली होती. तिने आपला मौल्यवान कंठा काढून बाजूला ठेवला व केस विंचरू लागली. इतक्यात तिथे उडत उडत एक कावळा आला व त्या कावळ्याला तो कंठा म्हणजे काही तरी खाण्याची वस्तू वाटली. तो कंठा घेऊन तो कावळा उडून गेला व लांब एका झाडावर बसून त्याने तो कंठा खाण्याचा प्रयत्न केला. त्या कंठ्यात हिरे जडलेले होते. कठोर अशा हिऱ्यावर चोच मारून तो थकला व त्याने तो खाण्याचा नाद सोडून दिला, तो कंठा तसाच झाडावर लटकत ठेवून अन्नाच्या शोधासाठी आकाशात भरारी मारली.

इकडे राणीने केस विंचरले व तिच्या लक्षात आले की आपला कंठा गायब झाला. इकडे तिकडे शोधूनही तो सापडेना. शेवटी ती रडत-रडत राजाकडे गेली व म्हणाली, 'महाराज माझा प्राणप्रिय असा कंठा चोरीला गेला आहे. तुम्ही त्याचा शोध घेण्याचे आदेश द्या.' यावर राजा म्हणाला की, 'दुसरे शाही दागिने आहेत की! तुला तोच कंठा कशाला पाहिजे?' पण राणीने ऐकले नाही व तोच कंठा पाहिजे असा हट्ट धरून बसली. राजाने कंठा शोधण्याचे आदेश दिले. सर्वजण कंठा शोधू लागले पण कोणालाही सापडेना. राजाने कोतवालाला बोलावून सांगितले कि, जो कोणी त्या कंठ्याचा शोध घेईल त्याला अर्धे राज्य बक्षीस म्हणून दिले जाईल. सर्व शिपाई, प्रजाजन, सैनिक सर्वजण कामाला लागले व शोधयंत्रणा सुरू झाली. अचानक कोणाला तरी तो हार सापडला. एका घाणेरड्या पाण्याच्या नालीत तो हार दिसला. पाणी इतके घाणेरडे होते की जवळून जाताना सुद्धा किळस यावी. असा दुर्गंध सगळीकडे पसरला होता. पण त्या पाण्यात तो हार दिसून येत होता. हार दिसताक्षणीच बक्षिसाच्या आशेने त्या पाण्यात उडी मारली. सगळीकडे पाण्यात शोधूनही तो हार काही मिळाला नाही. हार जणू गायबच झाला. सैनिकाने मारलेली उडी पाहून कोतवालाच्या मनातही लोभ निर्माण झाला. त्यानेही अर्धे राज्य मिळविण्यासाठी पाण्यात उडी मारली. पण हार पुन्हा गायब. त्या दोघांना जसा हार दिसला तसा इतरही लोकांना दिसला व सर्वजण बक्षिसाच्या आशेने घाण पाण्यात उड्या मारू लागले. पण हार कोणाच्याच हातात येत नव्हता.

सगळेजण उडी मारत आहेत पाहून मंत्री, सरदार, प्रधानजी यांनाही अर्ध्या राज्याची हाव सुटली व तेही घाणेरड्या पाण्यात उडी मारू लागले. पण हार गायब होऊन जाई. हार सापडत नाही हे लक्षात आले. मंत्री, प्रधानही घाणेरड्या पाण्यात उड्या मारताहेत हे राजाच्या कानावर पडल्यावर त्याला वाटले की हार जर सापडला तर आपले अर्धे राज्य गेले व त्यासाठी राजाही तिथे आला व आपली राजवस्त्रे उतरवली. त्यानेही त्या नाल्यात उडी मारली. त्याच वेळेस तेथून एक संत जात होते. राजाला उडी मारलेली पाहून ते मोठमोठ्याने हसू लागले. त्यांनी विचारले कि, 'हे सर्व काय चालले आहे? सर्वजण असे चिखलात-घाणीत का माखला आहात? राजा माणूस घाणेरड्या पाण्यात का उडी मारतो आहे?'

लोकांनी उत्तर दिले की, राणीचा हार पाण्यात पडला आहे म्हणून सर्वजण पाण्यात उडी मारताहेत. मात्र उडी मारल्यावर तो हार गायब होत आहे. 'असा कसा हार गायब होतो?' असे म्हणून ते साधू अजून मोठ्याने हसू लागले. लोकांनी त्यांना विचारले, 'काय झाले हसायला?' साधू त्यावर म्हणाले, 'अरे वेड्यांनो, तुम्ही ज्या हाराकडे पाहून पाण्यात उड्या मारत आहात तो हार झाडावर आहे. पाण्यात दिसते ते त्याचे प्रतिबिंब आहे. खरा हार तर वर आहे. तुम्ही प्रतिबिंबाला हार समजून पाण्यात शोधत आहात.' लोकांच्या लक्षात खरा प्रकार आल्यावर लोक शरमिंदा झाले.

**तात्पर्य** : मानवी जीवनाची पण आज त्या लोकांप्रमाणेच अवस्था झाली आहे. जे आपल्याला पाहिजे त्याच्या प्रतिरूपाकडे पाहून आपण ते मिळविण्याचा प्रयत्न करत आहोत. सुख, समाधान, शांती, मनस्वास्थ हे शोधण्यापेक्षा आपण त्याचे प्रतिबिंब जवळ करत आहोत. यातून काही मिळवण्यापेक्षा आपण कितीतरी गोष्टी गमवतच आहोत.

***

**राजू वधे**
एस.वाय., बी.कॉम.



# सोशल मिडिया

खराखुरा अनुभव म्हणून, उपदेश न करता एवढंच सांगेन की. मी सोशल मिडियाच्या आहारी न जाता, खरंखुर जगायला वेळ काढण्याचा प्रयत्न करतेय.

डीपी, स्टेटस्, सेल्फी, ट्विट, ओएमजी, आरओएफएल् हे शब्द काही वर्षापूर्वी आमच्या शब्दकोषातही नव्हते. यावर आता आमचाच विश्वास बसत नाही. दिवसातले काही तास, अनेकदा दिवसचे दिवस आपण कुणालाही प्रत्यक्षात न भेटता राहू शकतो. यावर कुणाचा खास विश्वास नव्हता. आपल्या व्यक्तिगत आयुष्यातल्या गोष्टी कुणाला सांगायच्या नसतात, या शिकवणीतून निपजलेली आमची पिढी अचानक आज कोणती भाजी बनवली, आज कुठे जेवण करतोय, हे सोशल मिडियाच्या माध्यमातून सगळ्या जगाला ओरडून सांगेल; असं कुणी १० वर्षापूर्वी जरी सांगितलं असतं, तर आपण सगळे हसलो असतो.

सोशल मिडिया हे मुळात कम्युनिकेशनचे, संवादाचे माध्यम! दूर राहणारे नातेवाईक, संपर्कात नसणारी मित्रमंडळी या सगळ्यांना बांधून ठेवायला हे इंटरनेटचं जाळं कामी येणार असं वाटून सुरू झालेले हे संवाद प्रयत्न आणि यांनी संवादाची भाषाच बदलली. तरुणाईची परिभाषा बदलली. 'कूल' असणं अचानक महत्वाच झालं!

कालपर्यंत कपाटात दाबून ठेवलेली गुपित ही ब्लॉगच्या रुपांतून बाहेर यायला लागली. सोशल मिडियामुळे अनेकांना वाटू लागलं की आपण नट, कलाकार, गायक, लेखक, स्वयंपाकी किंवा जगातलं इतरही बरेच काही आहोत. आत्मविश्वास मिळविण्यासाठी ही चांगलीच गोष्ट असावी. पण ही लोकप्रियता क्षणभंगूर आहे. कारण हा फक्त काही 'लाइक्स'चा मामला आहे. आता तुमचा व्हिडीओ लाईक करणारे (अनेकदा तो न बघताही) दुसऱ्या क्षणाला दुसरं काहीतरी लाईक करतात. अर्ध्या तासापूर्वी काहीतरी वेगळा ट्रेन्ड होता, आता काहीतरी वेगळं! आपणही कुणाबाबत तरी असचं करत असतो. हे सगळचं कमाल आणि धमाल आहे.

मुळात हे माध्यम जास्तीत जास्त मित्रांच्या संपर्कात राहण्यासाठी तयार झालेलं माध्यम. आता या माध्यमावर आपले किती मित्र आहेत, फॉलोअर आहेत, याची अहमहमिका कधी सुरू झाली? सेल्फी घेताना जीव गेला. फेसबुक, ट्विटरच्या माध्यमातून लाखोंना गंडा घातला गेला. व्हॉट्सप ग्रुप चॅट वरून झालेली खरी भांडण! या बातम्या ऐकताना हसावं की रडावं तेच कळत नाही. व्हॉटसअॅप ग्रुप हे अजून एक पिल्लू आहे. माझ्या नाटक / सिनेमा / रिडींगमुळे माझे असेच अतोनात ग्रुप आहेत. एकाचवेळी जास्त लोकांना एखादा संदेश द्यायचा असतो किंवा अनेकजणांच्या वेळा जुळवून आणायच्या असतात; म्हणून हे ग्रुप असतात, हे माहित आहे मला! पण मग घरच्यांचे ग्रुप तयार होतात. सासर, माहेर, भावंड, इत्यादी इत्यादी! मग गुडमॉर्निंग, गुडनाइटच्या संदेशाचा, त्याचबरोबर उपदेशांचा रतीब होतो. बघताय काय, हे




नवीन आहे, फॉरवर्ड करा, असे आदेश येतात आणि आपणही ती साखळी तोडायची नाही, अशी शपथ घेतल्यासारखे फॉरवर्ड करतो.

'ट्रोलिंग' हा शब्दही आपण नव्याने शिकलो आहोत. ट्रोल म्हणजे इंटरनेटमधल्या राक्षसाचा ज्या लोकांना समोरच्यांचं पटत नसतं, त्याला ते नाकारण्याची मुभा असते. आपण अशा जगात राहतोय, जिथे आपल्याला सवय लागलीय की, आपल्या मनांत जे येतंय, ते तसंच्या तसं आपल्या व्हर्च्युअल भितींवर रंगवायची. मग समोरच्याला ते नसेल आवडलं तर तो रंग बिघडविणार! सोशल मिडियामुळे आपल्या मनातला राग, द्वेष, विखार ओकून टाकायला जागा मिळाली आहे. या सर्व साधनांचा, ॲप्सचा, या सोशल मिडियाचा हेतू लोकांना जवळं आणणं हा होता. पण आता आपल्याला लागलंय व्यसन आणि कुठल्याही गोष्टीचं व्यसन हे वाईटच.

बरं, मुळात कुठेतरी आपल्याला असं वाटत असत की, हे सगळं फुकट घडतंय! अनेकदा सोशल मिडिया साइटस्वर तुमचं रजिस्ट्रेशन फुकटच असतं. पण त्यानंतर जो मोबाईल हे डेटा आपण त्यावर किलोकिलोने खर्च करतो त्याच काय? मोबाइलची ही भली मोठी फुगीर बिलं येतात, तेव्हा आपण ते कशावर खर्च केलेत हे लक्षात तरी असत का? आणि असतील तर कदाचित सगळ्यांकडे पैसे खूप प्रमाणात आहेत हे मान्य करावं लागेल. पण गेलेल्या वेळेच काय? आणि मुळात नात्यांचं काय? अनेकदा अभिनयाच्या कार्यशाळा घेताना माझ्या लक्षात येतं की समोरची माणसं... आतून कोरडी, कोरडी झालीयत. यात फक्त सोशल मिडियाचाच हात आहे, असं नाही. बदलती परिस्थिती, धावत जग. जीवघेणी स्पर्धा या सगळ्यांचाच हा परिणाम आहे. पण सतत सोशल मिडियावर राहणारी माणसं जास्त एकटी होत जातात; असं माझ निरिक्षण आहे. जेव्हा आपण आपल्या मित्रांपैकी कुणाचे तरी महागड्या रेस्टॉरंट मध्ये खाताना, पिताना फोटो बघतो, तेव्हा मनातून वाटतं राहतं की, मी पण माझा फोटो टाकणार. कुठेही गेलो तरी ती जागा, करायला गेलोय ती गोष्ट मनापासून एन्जॉय करण्यापूर्वी असं वाटायला लागतं की, आधी याचे फोटो इतरांसोबत 'शेअर' केले पाहिजेत.

थोडं तारतम्य बाळगलं, तर त्या माध्यमाचा छान उपयोगही करुन घेता येतो. मी नाटकातून काय शिकले असेल तर, ती जिवंत अनुभूतीची मजा! नाते संबंधातील प्रश्नांची, उत्तरांची, जगण्याची, स्पर्शाची... खराखुरा अनुभव म्हणून, उपदेश न करता एव्हढंच सांगेन की, मी सोशल मिडियाच्या आहारी न जाता, खरंखुरं जगायला वेळ काढण्याचा प्रयत्न करतेय.

तुम्ही देखील ते अनुभवून पहा. जास्त मजा असं खरंखुरं जगण्यात आहे.

***

**गायत्री जाधव**
टी.वाय., बी.कॉम.



# मुलगी का नको?

मुलगी होणं अपयश आहे का हो?

मुद्दामच मी हा प्रश्न सुरवातीला घेतला आहे, कारण आजची परिस्थितीच तशी आहे.

कोणत्याही घरात मुलगी जन्माला आली की आपल्याकडून अपराध झाला आहे असं मानतो. समाजात ती जन्माला येण्यापासून ते जीवन संपेपर्यंत तिरस्कार केला जातो. तिचे आनंदाने स्वागत करण्याऐवजी दुःखाने स्वागत होते. असन का घडतेय? याचा विचार आपण कधी करणार?

तिला मन नाही की जीव नाही... फक्त मुलगा नाही म्हणून मुलींचा समाजाकडून तिरस्कार होतोच पण स्वतःच्या कुटुंबाकडूनही तिरस्कार केला जातो. ती जसजशी मोठी होते तसतशा अडचणी वाढत जातात.

काही कुटुंबामध्ये मुलगा व मुलगी यात खूप भेदभाव केला जातो. घरात फक्त मुलांनाच शिक्षण दिले जाते आणि मुलींना नाही! असं का?

कारण ती मुलगी आहे ना! ती कशी काय शाळेत जाऊ शकते, असा विचार करणारे काही पालक आढळतात. पण का नाही जाऊ शकत मुली? मुलींनाही मुलांप्रमाणे विचार करण्याची क्षमता असते. तिलाही शाळेत जाण्याची इच्छा असते. तरीही मुलींना शाळेत जाऊन देत नाहीत आणि मुलांसाठी हवं ते करतात. असं का? कारण तो मुलगा आहे. आपल्या वंशाचा दिवा आहे. मुलगा आई वडीलांचा म्हातारपणाचा आधार आहे. त्यांना वाटते मुली लग्न करून दुसऱ्याच्या घरी जातात, त्या दुसऱ्यांच्या होतात आणि मुलगा शेवटपर्यंत जवळ राहतो, मरण पावल्यावर पाणी पाजण्यासाठी मुलगाच लागतो. का? मुली हे काम करू शकत नाही का? आजच्या काळात आईवडीलांची सर्वात जास्त काळजी कोण घेत असेल तर ती मुलगीच, मुलांपेक्षाही मुली जास्त काळजी घेतात.

मुली तर माहेर आणि सासर ही दोन्ही घर प्रकाशमान करतात. परंतु हे लोकांना कळत नाही. आज मुली आकाशाला गवसणी घालत आहेत. जर इंदिरा गांधी पहिल्या पंतप्रधान होऊ शकल्या, किरण बेदी पहिल्या पोलिस उपनिरिक्षक होऊ शकतात, कल्पना चावला पहिल्या अंतराळवीर होऊ शकतात तर मुली काय नाही करू शकत? आज गरज आहे. समाजाला विचार बदलण्याची, मुलींकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलण्याची! कृपया मुलींना मुलांपेक्षा कमी समजू नका. मुलीही उंच भरारी घेऊ शकतात.

मुली वाचवा... मुली शिकवा.

***

**अक्षय तवार**
एफ.वाय., बी.ए.



# कॉलेजचे स्नेहसंमेलन : विद्यार्थांसाठीचे व्यासपीठ

मागच्या वर्षी शरदचंद्र पवार आर्टस् ॲन्ड कॉमर्स कॉलेजमध्ये ॲडमिशन घेतलं आणि जाहीर झालं की, महाविद्यालयाचं स्नेहसंमेलन होणार आहे.

खरंतर आनंद इतका झाला होता की, काय करावं सुचत नव्हतं. विद्यार्थ्यांनी त्या संमेलनात अतिशय चांगल्या प्रकारे आपले नृत्य सादर करून उपस्थितांना थक्क केलं होतं. आम्ही सुद्धा आमची जी पथनाट्याची टिम होती. त्यांनी सर्वांनी मिळून एक नाटक बसवलं. (चांदनी बार) तर ते नाटक तेव्हा इतकं प्रेक्षकांना आवडल की विचारू नका. तेव्हांपासून मी पुढचं स्नेहसंमेलन कधी होतंय; याचाच विचार करत होतो.

अखेर स्नेहसंमेलनाचं दुसरं वर्ष आलं. यावर्षी काहीतरी भन्नाट करायचं, अस मी आणि राजूने ठरवलं होतं. त्यानंतर मला एक दिवशी गायकवाड मॅडम भेटल्या आणि म्हणाल्या की, ''आम्ही एक पोवाडा बसवतोय आणि त्यात अफजल खानाचा रोल करायचाय, तर तू करशील का?''

खरंतर काम तसं जोखमीचं होत. कारण अफजलखानाचा रोल करण एवढ सोप्पं पण नाहीये. मग मी शेवटी हो-नाही करत करत ठरवलं की करायचाच आता अफजलखानाचा रोल! पोवाड्यातील सहभागी सर्वच विद्यार्थी प्रचंड मेहनत घेत होते. आम्ही भरपूर सराव केला, नव्हे तर गायकवाड मॅडमनी तसा सराव करून घेतला आमच्याकडून. पोवाडा यशस्वी होण्यासाठी सगळे धडपडत होते. अखेर पोवाडा सादर केला गेला आणि तो खूप यशस्वी झाला. छत्रपती शिवाजी महाराज, अफजल खान, राजमाता जिजाऊ यांची पात्रं तर जणू प्रत्यक्षात अवतरली की काय असं वाटत होत. तसे माझे तीन ते चार परफॉर्मन्स होते. त्यापैकी एक म्हणजे हा पोवाडा. आमच्या Crazy Boys ग्रुपचा एक funny dance होता. मी, राजू वाढे, मंगेश हापसे, ज्ञानेश्वर कदम, रोहित पवळे, श्रीराम इंगळे हे सर्वजण त्यात होते. राजूने मला अत्यंत मोलाचं मार्गदर्शन केलं. माझं ते तिसरं सादरीकरण! त्यात मैत्रीच्या नात्याला अनूसरून संगीतमय प्रकार होता. हा थोडा इमोशनल असल्यामुळे शेवटी सर्वांच्या डोळ्यात पाणी आलं होतं. यासाठी आम्ही प्रचंड मेहनत घेतली. यामध्ये मला आणि राजूला साथ देण्यासाठी आकाश भडगावी आणि नम्रता यांनी खूप मदत केली.

एकदंरीत सर्व शिक्षकांची कार्यक्रम चांगला होण्यासाठीची धडपड बघून मी तर थक्क झालो की, एवढं सगळ कशासाठी ते करतात? तर निश्चितच विद्यार्थ्यांसाठीच! गायकवाड सर आणि मिटकर सरांचं नियोजन असो किंवा कदम सर आणि बारी सरांचं प्रत्यक्ष कार्यक्रमाचे नियोजन असो, हे सर्व पाहिल्यानंतर वाटत की, हे सर्व किती धडपडतात कार्यक्रम चांगला होण्यासाठी.

महाविद्यालयाचे सर्व शिक्षक, कर्मचारी, मा. श्री. प्राचार्य मिसाळ सर, बी.सी.ए. विभागाचे प्रमुख मा. श्री. येवते सर यांची सर्वांची धडपड बघितली की असं वाटत, की यामुळेच विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना कुठेतरी महाविद्यालयामध्ये वाव मिळतो आहे आणि मनात एक समाधानाचा सूर उमटतो. मला या कार्यक्रमाच्या वेळी अनेकांनी प्रोत्साहन दिले कि 'तू चांगला अभिनय करतो.' त्यामुळे नवी उमेद जागवली गेली. यासाठी खरच सर्व मित्र मैत्रीणींचे आणि महाविद्यालयाचे मनापासून आभार.

***

**योगीराज ज्ञानेश्वर खैरनार**
एस. वाय., बी.बी.ए.



# अनिरुद्ध ग्रुप ऑफ कंपनीज्

## अनिरुद्ध प्रॉपर्टीज्

पिंपरी-चिंचवड शहरालगत १, ५ आणि ११ गुंठ्याचे, राहण्यायोग्य कलेक्टर एन.ए. प्लॉटस् उपलब्ध!
कोकणच्या निसर्गरम्य वातावरणात रत्नागिरी, रायगड येथे कलेक्टर एन.ए. ५ व ११ गुंठ्याचे फार्म हाऊस प्लॉट तसेच शेती झोनचे २० गुंठ्याचे प्लॉट आकर्षक दरात उपलब्ध!

## अनिरुद्ध डेव्हलपर्स

लँड डेव्हलपर्स व बिल्डींग मटेरियल सप्लायर्स, १०० एकरांपर्यंत इंडस्ट्रीयल व रहिवासी प्लॉट डेव्हलप करुन दिले जातील.

## अनिरुद्ध फायनान्स

आळंदी, दिघी, चऱ्होली, मोशी, भोसरी या परिसरातील दुकानदार, लघुउद्योजक, हॉटेल चालक व तत्सम व्यावसायिकांसाठी दैनिक बचतीची सुविधा उपलब्ध तसेच कमीत कमी कागदपत्रात कर्जाची सुविधा

## अनिरुद्ध ट्रान्सपोर्टस्

आमच्याकडे विविध कामांसाठी डंपर, ट्रक, जे.सी.बी., पोकलेन मशिन योग्य दरात भाड्याने मिळतील.

## अनिरुद्ध एन्टरप्राईजेस

सिमेंट, वीट आणि ब्लॉकचे उत्पादक आणि होलसेल विक्रेते

विश्वासू आमची सेवा
'नाव' लक्षात ठेवा!



**प्रोप्रा.: अनिरुद्ध तापकीर**

ANIRUDHA PROPERTIES
Real Estate

संपर्क : 'अनिरुद्ध प्रॉपर्टीज, देहु फाटा, एम.आय.टी. कॉलेजजवळ, देहु-आळंदी रोड, आळंदी (देवाची), ता. हवेली, जि. पुणे ४१२१०५
Email : anirudhatapkir@gmail.com
**फोन : ९८२२३८६३११, ९६२३१५२९६२**




साहित्य, कला व संस्कृतीच्या
शब्दांनी सजलेली व
तरुणाईच्या विविध भावनांनी बहरलेली...



# काव्य मैफिल

(काव्य विभाग)








# कॉलेज

कॉलेज के ये मधुर क्षण
फिर ना वापस आऐंगे
सोच लो ये दोस्तो कल
हम सब जुदा हो जाऐंगे!

भूल सकोगे क्या तुम कभी
कॉलेज की जीवन कहानी
याद करेंगे सब ये कहानी
आऐंगी जब याद पुरानी!

आज तुम हो, कल हम थे
मंदिर है कॉलेज हमारा
कहाँ रहेंगे तुम, कहाँ रहेंगे हम
फिर न होगा, मिलन हमारा!

आज यहाँ जो पढते है
कल उनको भी जाना पडेगा
हम ना रहेंगे, तुम ना रहोगे
पर कॉलेज हमारा, अमर रहेगा!
***

# घर (एक मुक्तछंद)

घर म्हणजे प्रेमाचं भांडार असतं
त्या भांडारात सगळं काही
गच्च भरलेलं असतं!

घर म्हणजे ती साखळी
ज्यात माणसांची मने
एकमेकांशी जोडलेली असतात!

घर म्हणजे रुसवे फुगवे
प्रेम जिव्हाळा यांची बांधलेली जोड
म्हणूनच ती नाती असतात गोड!

घर ते असतं, ज्यातील माणसे
एकत्र येऊन सुख-दुःख वाटून घेतात

घर म्हणजे फक्त
चार भिंतीचा निवारा नव्हे
तर एकमेकांना लागलेला लळा
अन् प्रेमाचा निखळ झरा असतो!
***

# आमचे कॉलेज

शरदचंद्र पवार कॉलेजमध्ये
प्रत्येकाचे जीवन घडे
कारण येथे मिळतात
शिक्षणासोबत नैतिकतेचे धडे!

प्राध्यापक असतील येथे
जरी वयाने जरा लहान
पण नंतर प्रचिती येते
मूर्ती लहान पण किर्ती महान!

कॉलेजमधील शिक्षणाला नम्रतेची
व परिपूर्णतेची चव आहे
म्हणूनच तर आपल्या पंचक्रोशीत
या संस्थेचे नाव आहे!

येथून घडते एक आदर्श व्यक्तीमत्त्व
येथेच प्रत्येक विद्यार्थी शिकतो
यशाचे शिखर सर करण्याचे तत्त्व!
***

**श्रद्धा संतोष बवले**
एस.वाय. बी.कॉम.



# जगणं

आयुष्यभर सोबत असून
जवळ कधी बसत नाही
एकाच घरात राहून आम्ही
एकमेकांस दिसत नाही!

हरवला तो आपसांतला
जिव्हाळ्याचा संवाद
एकमेकांस दोष देऊन
नित्य चाले वादविवाद!

धाव धाव धावत आहे
दिशा मात्र कळत नाही
हृदयाचे पाऊल कधी
हृदयाकडे वळत नाही!

इतक जगून झालं पण
जगायला वेळ नाही
जगतो आहोत कशासाठी
कशालाच कशाचा मेळ नाही!

क्षण एक येईल असा
घेऊन जाईल हा श्वास
अर्ध्यावरच थांबलेला
असेल जीवन प्रवास!

अजूनही वेळ आहे
थोड तरी जगून घ्या
सुंदर अशा जगण्याला
डोळे भरून बघून घ्या!

***

**प्रतिक्षा संभाजी मुंगसे**
एस. वाय. बी. कॉम.



# फौजी

ठेवून सुखात आपल्याला
काट्यावरी जो चालतो
सुखाची झोप देऊन
रात्रभर तो जागतो!

सीमेवरी राहून
मातेची रक्षा करतो
शत्रुंशी लढून छातीवर
गोळ्या तो झेलतो!

वार हातावर घेऊन
मात्र मातीला वाचवतो
अश्रू पिऊन स्वतःचे
प्राण पणाला लावतो!

वेळ येताच देशासाठी
अमरही तो होतो
डोळे झाकताच
भारत माता म्हणतो!
तो म्हणजे वीर जवान
फौजी आणि फौजीच असतो!!

***

**शुभम भरत वाबळे** (एफ.वाय.बी.ए.)

# माझे कॉलेज

शरदचंद्र पवार कॉलेज
आहे आळंदीची शान
यासारखा नाही, कुणाला मान
यातील शिक्षक आहेत महान
यामध्ये शिकतात मुले छान-छान
प्राचार्यांचा आहे एकच ध्यास
विद्यार्थांना यश मिळावं खास
सर्व शिक्षकांची आहे
हीच एक आस
सर्व विद्यार्थांनी व्हावे
चांगल्या गुणांनी पास!

\- **पूजा बोटे** (टी. वाय. बी. कॉम)



# आई व बाबा

आई तुळशीसमोरचा दिवा असते
बाबा त्याचा मंद प्रकाश असतात
आई अंगणातील रांगोळी असते
बाबा त्या रांगोळीचा रंग असतात!
आई देवासमोरचे निलांजन असते
तर बाबा त्याची ज्योत असतात
आई घरभर पसरलेला धूप असते
बाबा त्यातील सुगंध असतात!
आई मनावरचा संस्कार असते
बाबा ते घडविणारे पालक असतात
आई आयुष्याची वाट असते
बाबा त्या वाटेवरचे साथी असतात!
आई एक वाक्य असते
बाबा वाक्यातील शब्द असतात
आई एक कविता असते
बाबा त्याचा भाव असतात!
सूर्याचे तेज म्हणजे आई असते
बाबा त्याची किरणे असतात
आई असते आपली माऊली
त्या माऊलीची साथ बाबा असतात!
जिद्द म्हणजे आई असते
मनातला विश्वास
म्हणजे बाबा असतात
आई हे भावनेतले जग असते
बाबा जणू सारे विश्वच असतात!

***

**योगेश दिनकर वाघ**
एफ. वाय.बी.कॉम.

## मन

जितके मोठे मन तितके मोठे जीवन
वादाने अधोगती संवादाने प्रगती
जग काय म्हणेल याचा विचार करू नका
कारण लोक फार विचित्र आहेत.
अपयशी लोकांची थट्टा करतात आणि
यशस्वी लोकांवर जळतात!

*

## आई

आईची असते कोमला माया
लेकरावर असते सदा तिची छाया
आईमुळे निर्माण झाला महाराष्ट्र
तीच घेते परिवारासाठी सर्वाधिक कष्ट
आई आहे एक पवित्र नातं
म्हणून जग तिचा महिमा गातं
आई आहे कधीही न तुटणारं नातं
तेच नातं लेकरासाठी कष्ट झेलत राहतं
आई आहे या जगाची मोठी शक्ती
म्हणून सारं जग करत तिची खरी भक्ती
आई आहे देवाच वरदान
आज जग देतो तिलाच मान!

*

## दोस्ती

मिलना बिछडना सब किस्मत का खेल है,
कभी नफरत तो कभी दिलो का मेल है,
बिक जाता है इस दुनिया मे हर रिश्ता,
बस एक दोस्ती है जो 'नॉट फॉर सेल' है ।

*

## शिक्षक का अर्थ

**शि** - शिखर तक ले जाने वाला
**क्ष** - क्षमा की भावना रखने वाला
**क**- कमजोरी दूर करने वाला

अर्थात जो विद्यार्थी की हर गलती को क्षमा करने की भावना रखता है और उसकी हर कमजोरी दूर कर उसको शिखर (सफलता) तक ले जाता है। वही सच्चा शिक्षक कहलाता है।

**वैशाली अशोक खंडागळे**
टी.वाय.बी.कॉम.

## जगायच असतं!

झालं गेलेलं दुःख वळून कधी
बघायच नसतं
सुख शोधण्यासाठीच तर पुढे
जगायच असतं
दुःखाचा डोंगर असेल तर
सुखाचा क्षण पण असतो
सुख दुःखाचे कोठार
फक्त एक मनच असते
क्षणाचेच जीवन बनायच असतं
सुख शोधण्यासाठीच तर.....
दुःखाचा डोंगर असेल तर
सुखाचा सागर पण असतो
छोट्याशा डोंगराआड
एक विशाल सागर असतो
डोंगर चढताना कधी हरायच नसतं
सुख शोधण्यासाठीच तर
थेंबा थेंबाचा सागर बनतो
तर क्षणा क्षणाचा दिवस
दिवसाचे मग वर्ष बनते
तर वर्षांचेच आयुष्य
क्षणाला कधी विसरायच नसतं
सुख शोधण्यासाठीच तर
जगायच असत.....

***

**तेजस्विनी जाधव** (टी.वाय.बी.कॉम.)

## आयुष्य

आयुष्याच्या वाटेवर चालताना
सुख- दुःखाच्या ठेचा लागल्या
म्हणून थांबायच नसतं
उलट रक्ताळलेल्या पायांनीच
आयुष्याच्या पैलतिरी जायच असतं
अहो, नशीब मात्र कुणीच कोणाचं
लिहिलेल नसतं,
म्हणून तर स्वतःच आयुष्य स्वतःलाच
घडवायच असतं
येणारी सुख-दुःखे येत असतात
म्हणून खचून जायचं नसतं
उलट भट्टीतून निघालेल्या सोन्यासारखं
झळाळून निघायचं असतं!

- **पांडुरंग सुर्यवंशी** (टी.वाय.बी.कॉम.)

## शिवकार्य

काहीजण सारखे विचारतात
हे 'शिवकार्य' म्हणजे काय?
तर हे त्यांच्यासाठी माझ्या शब्दात
सांगण्याचा एक छोटासा प्रयत्न!

***

'शिव'नामाचा गजर आणि शिवचारित्र्याचा
अखंड जागर म्हणजे **'शिवकार्य'** ।।
भरबाजारात आपल्या आया-बहिणींच्या
अब्रुची धिंड काढली जात असताना त्या
नराधमांपासून आपल्या आया-बहिणींचे
केलेले रक्षण म्हणजे **'शिवकार्य'**।।
परस्त्रीला 'आई' आणि मित्राच्या
बहिणीला 'ताई' म्हणून आपुलकीने
घातलेली साद म्हणजे **'शिवकार्य'** ।।
स्वधर्माचा अभिमान आणि परधर्माचा
राखलेला आदर म्हणजे **'शिवकार्य'** ।।
गडसंवर्धनार्थ ऊनपावसाची तमा न बाळगता
कोणत्याही फळाची अपेक्षा न ठेवता
निस्वार्थ केलेली धडपड म्हणजे **'शिवकार्य'**।।
गुरू, आई-वडिलांनी केलेल्या संस्कारांची
जाण ठेवून केलेली सेवा म्हणजे **'शिवकार्य'**।।
कोणत्याही प्रकारची ओळख नसताना,
मग तो लहान असो की मोठा
त्याला 'दादा' किंवा 'भाऊ' म्हणून
आदराने घातलेली साद म्हणजे **'शिवकार्य'**
तारीख की तिथी? हा खरा इतिहास
अन् हा खोटा इतिहास?
मी मोठा कि तू मोठा ?
ह्या असल्या निरर्थक बाजार-भानगडीत
न पडता मला माझ्या 'राजांसाठी'
काहीतरी करायचंय ही भावना मनात
निर्माण होणं म्हणजे **'शिवकार्य'**।।
'शिवरायांच्या' पदस्पर्शाने पावन झालेल्या
निष्ठावंत मावळ्यांच्या रक्ताने पुनित झालेल्या
मातीच्या प्रत्येक कणाला
माथा लावणे म्हणजे **'शिवकार्य'**।।
राजमाता आऊसाहेबांची शिकवण
स्वराज्यनिष्ठ मावळ्यांचे बलिदान
शिवशंभुच्या आदर्शाची ज्योत सतत
हृदयात तेवत ठेवणे म्हणजे **'शिवकार्य'**।।

***

**हर्षदा राजेश जांभळे** (एफ.वाय.बी.बी.ए.)



# प्रिय सखी, आयुष्य जगून घे

गितांजली राजाराम नितनवरे

मी म्हणते बिनधास्त जग
चिंता नको करू
कुणाबद्दल मनामध्ये
राग नको धरू ।।

जे काय वाईट घडलं
त्याला लाव काडी
वर्तमानात जग जरा
मजा घे थोडी ।।

संकट येत राहतील
घाबरून नको जाऊ
कोणत्याच गोष्टीचा
करू नको बाऊ।।

भिऊ भिऊ रोजच जगतेस
जरा मोकळा श्वास घे
मित्र-मैत्रिणी जवळ कर
आणि थोडी मजा घे ।।

चौकटीत राहून राहून
कंटाळा येणारच
चार चौघात बसल्यावर
दुःख पळून जाणारच ।।

स्त्री झाली म्हणून काय
तिला मन नसतं का?
गुलाबी, लाल रंगाचं
तिच वाकड असत का?

शेजारणींनी मैत्रिणींनी
एकत्र आलं पाहिजे
रंग खेळून मन कसं
चिंब झाले पाहिजे ।।

मोठ झाल्यानंतर सुद्धा
लहान होता येतं
मुखवटा न घालता
आयुष्य जगता येतं ।।

गप्पा मार, जोक सांग
खळखळून हास
अर्धी भाकरी जास्त घे
म्हणू नको बास ।।

मन मोकळं जगल्यानं
ब्लडप्रेशर होत कमी
अटॅक बिटॅक येणार नाही
याची अगदी नक्की हमी ।।

कितीही चांगल वागलं तरी
जग वाईटच म्हणणार आहे
तुझा कोण भव्य-दिव्य
पुतळा उभारणार आहे?


म्हणून म्हणते आता तरी
मनावरच ओझं झुगारून दे
मोकळेपणी श्वास घेऊन बघ
आणि थोड जगून घे ।।



# आई... मला जन्म घेऊ दे!

तू पाहिले जग,
मला देखील पाहू दे
सांग आई... बाबांना,
जन्म मला घेऊ दे ।।
परमेश्वर प्रत्येकाच्या
घरी जाऊ शकत नाही
त्याच्या जागी तू आहेस,
कसे तुला कळत नाही
ताईसवे माझ्या मला
आनंदाने न्हावू दे
सांग आई... बाबांना
जन्म मला घेऊ दे ।।
हुंडा लागतो मोठा म्हणून
त्रास माझा वाटतो का?
झरा तुझा मायेचा
म्हणून असा आटतो का?
राखीसाठी दादाच्या
निदान मला येऊ दे
सांग आई... बाबांना
जन्म मला घेऊ दे ।।
तू बहिण तू कन्या
तू एक स्त्री आहे
काल जिथे तू होती
आज तिथे मी आहे
तू जसे विणले नाते
तसे मला विणू दे
सांग आई... बाबांना
जन्म मला घेऊ दे ।।
पहा फिरून मी पुन्हा
कधी येणार नाही
भाग्य कन्यादानाचे
दोघांनाही देणार नाही
डोळे येता भरून तुझे
पदर मला होऊ दे
सांग आई... बाबांना
जन्म मला घेऊ दे ।।

**प्रज्ञा ज्ञानेश्वर घोलप** (एस.वाय.बी.कॉम.)




# शिक्षक

शिक्षकांकडे काय असते
आयुष्यभर काटकसर करून
जमवलेली थोडी पुंजी असते
चाकोरीबद्ध जगण्याची
त्याला सवय असते
सामाजिक बांधिलकीची
त्याला जाण असते
संस्कारांची शिदोरी घेऊन
साधेपणाने जगण्याची
त्याच्यात उर्मी असते
मनासारखी एखादी गोष्ट
घडली नाही तर
त्याला त्याची खंत असते
यापलीकडे माणूसपण जपून
संस्कृती जपण्याची चिकाटी असते
शेवटी शब्दांपलिकडे शिक्षकांकडे
दुसरे काय असते...!
***

**गौरी भिमराव कुंभार** (एम. कॉम.प्रथम)

# फुले वाहू नकोस

आयुष्यभर जळतच होतो
आणखी चटके देऊ नकोस

जेव्हा माझा अंत होईल
तेव्हा मात्र रडू नकोस

जन्मभर मी रडतच होतो
शेवटी रडणे ऐकवू नकोस

माझ्या शरीराचे ओझे तू
तुझ्या खांद्यावर घेऊ नकोस!

आयुष्यभर मी ओझे वाहिले
उपकाराचे ओझे ठेवू नकोस

माझ्या निष्पाप देहावर
तू फुले वाहू नकोस!
***

**नागेश्वर लोखंडे** (एफ.वाय.बी.ए.)



# झेप

आकाशातला एक तारा
आपला असा थकलेला
डोळे उघडताच चमकून दिसावा

एक छोटे जग प्रत्येकाजवळ असावे
जगाच्या गर्दीत कोणीच एकटे नसावे

क्षितिजापलिकडे पाहण्याची
दृष्टी असेल तर क्षितीज
नक्की गाठता येतं!
आपल्या रक्तातच धमक असेल
तर जगही जिंकता येतं!

आपले क्षितीज हे
आपण ठरवायचं असतं
त्याच्या पलीकडे पाहण्याच
धाडस एकदा तरी करायच असत!

असते आपल्या रक्तात
जिद्द व ताकद
त्या ताकदीला एकदातरी
अनुभवायचं असतं!

उडत्या पाखरांना
परतीची तमा नसावी
नजरेत सदा
नवी दिशा असावी

घरट्याचे काय...
बांधता येईल केव्हाही
ही क्षितीजाच्याही पलीकडे
झेप घेण्याची जिद्द असावी!
***

**अश्विनी संजय कपले**
एस.वाय., बी.बी.ए.



# वीर पुत्राच्या मुलीचे मनोगत

कवेत घेणारा बाबा
आज तिरंग्यात आला

हुंदका आवरून माझा
मी त्याला सलाम केला!

खांद्यावर घेणारा बाबा
आज दुसऱ्याच्या खांद्यावर आला

एकदा परत बोल म्हणूनी
मी त्याचा पापा घेतला!

अखेरचे काल बोलूनी
आज तो अबोल झाला

देशासाठी प्राण देऊनी
आम्हाला पोरकं करून गेला!

काळजी घेत जा म्हणूनी
त्याचीच काळजी विसरला

एकटे सोडून आम्हांला
तो देशासाठी अमर झाला!

**वृषाली तेजस जाधव**
एम. कॉम.(प्रथम)



# तहान

सरली सुरेल थंडी
फोफावला उन्हाळा
संतप्त सूर्य आता
ओकेल तप्त ज्वाळा!

पक्षी दिशा दिशांना
फिरतील ते थव्यांनी
सुकतील कंठ त्यांचे
मग शोधतील पाणी!

सुकली तळी जळाची
पाणी पिण्यास नाही
त्या सानुल्या जीवांची
होईल लाही लाही!

त्यांच्या जीवाकरीता
इतकी कराच सेवा
वाटीत एवढेसे
पाणी भरून ठेवा!

**- ज्ञानेश्वर लक्ष्मण बावले**
एस. वाय.,बी.कॉम.



# ध्येय

ना कुणाशी स्पर्धा असावी
ना कुणापुढे जाण्याची आकांक्षा

केवळ स्वतःला सिद्ध करण्याची
जिद्द मात्र असावी!

आयुष्यात काही तरी
करून दाखवायचे असते

मात्र त्यासाठी मेहनत,कष्ट,
आत्मविश्वास, जिद्द याची
गरज असते!

अपेक्षा अशी असावी जी
ध्येयापर्यंत नेईल

ध्येय असे असावे, जे सुंदर
आयुष्य जगणे शिकवील!

**

**ऋतुजा राहूल संगवे**
(एफ.वाय.बी.ए.)

# मैत्री

काही शब्द नकळत कानावर पडतात
दुर असूनही कुणी जवळ वाटतात
प्रत्यक्षात ही मैत्रीची नाती अशीच असतात
आयुष्यात येऊन आयुष्यच बनतात!

**ऋतुजा राहूल संगवे** (एफ.वाय.,बी.ए.)



# दोस्ती : एक जिंदगी

सिर्फ रिश्तों की बंधन को विश्वास नहीं कहते,
हर आसू को जजबात नही कहते,
किस्मत से मिलते है दोस्त जिंदगी में,
इसलिए तो दोस्ती को इत्तेफाक नही कहते ।।१।।
दोस्ती से बडी चाहत क्या होगी
दोस्ती से बडी इबादत क्या होगी
जिसे दोस्त मिल जाए आप जैसा
उसे जिंदगी में शिकायत क्या होगी ।।२।।
दोस्ती नाम है सुखदुख की कहानी का
दोस्ती राज है सदा मुस्कुराने का
ये कोई पलभर की पहचान नही
दोस्ती नाम है जिंदगीभर साथ निभाने का।।३।।
दोस्त दोस्त नही, खुदा होता है
महसूस तब होता है जब वो जुदा होता है
दोस्त ना हो तो जीना भी सजा होती है
और दोस्त आप जैसा हो तो
जिंदगी का एक अलग ही मजा होता है ।।४।।
करते है खुदा से एक गुजारिश
तुम्हारे दोस्ती के सिवा कोई बंदगी ना मिले
हर जनम से मिले दोस्त तुम्हारे जैसा
या फिर कभी जिंदगी ना मिले ।।५।।
अगर जिंदगी मे जुदाई ना होती
तो कभी किसी की याद ना आयी होती
साथ ना हो तुम्हारे हर लम्हे तो
शायद यह जिंदगी जिंदगी ना होती ।।६।।

***

**गीता कोठारे**

# फरियाद

आँखो में रहनेवालों को
याद नही करते
दिल मे रहनेवालों से
बात नही करते!

हमारी तो यादों मे
बस गए हो आप
तभी तो हम आपसे मिलने की
फरियाद नही करते, दोस्तो..!

*

**किरण विजय म्हस्के**
एस.वाय., बी.कॉम.

# दुनिया

कोई बिखर रहा है ।
कोई संवर रहा है।
कोई जल रहा है।
कोई जला रहा है।
कोई अकेले में
अश्क बहा रहा है।
कोई नए रिश्ते
बना रहा है।
ये मतलबी जमाना है साहेब
यहां झूठ को सच और
सच को झूठ कहा जा रहा है ।
बडी बेगैरत है ये दुनिया
यहाँ इश्क को व्यापार और
व्यापार को इश्क कहा जा रहा है ।

*


**प्रिया तिपन्ना रेड्डी**
एस.वाय., बी.कॉम.

# दोस्ती

दोस्ती किसी की रियासत नही होती
जिंदगी किसी की अमानत नही होती
हमारी सलतनत मे देखकर कदम रखना
क्योंकी
हमारी दोस्ती की कैद मे जमानत नही होती ।

*

**प्रिया तिपन्ना रेड्डी**
एस. वाय. बी.कॉम.



# Is LIFE really beautiful ?

We all the time say that, the life is beautiful, but when I ask myself. It is really beautiful? then I got an answer..... “Life is beautiful but not easy when things happened according to us that time we started saying life is so beautiful. But, its not possible all the time that things will happen according to us. In the life nothing is easy as there are so many problems. challenges that we have to face with courage .

When we find definition of life. We get various people having different paints of views from each other. According to me “ Life is a chance to prove ourself who we are? and what we can do?” In the life. there are so many things to do when we want to do something, that time we face so many obstacles we need to face them with courage. Because challenges or obstacles do not come to destroy us. They come in our life to make us strong. some of them help us to recognize yourself like who we are? and our inner strength. We should be thankfull for all that we have and try to improve ourself. The journey of life may not always be smooth, but we must keep going and stay positive all the time difficulties test the courage and patience of human being. Adversity and hardship make person strong and ready to face the challenges of life with equanimity. There is no doubt about no gain without pain. So we should stop complaining and live life joyfully.


Above statement I gave about them who have difficulty in their life. now I state about them who have everything in life. The people who have everything they should share and half others who need it. We should think for others and be kind, helpful because these are human qualities and these things make us noble person. Help to other is a priceless emotion but people are so selfish that they only think about themselves. no one cares for others as according to them why they helps other because there is no benefit for doing this. They forgot their duties as human being only remember that they are only human but is needed to being a human.

People are more busy in earning money. They think money can buy anything and that's why we work from 9 to 5 and earn money. Then we think we got everything in life. Is it true? when we work for money we can not enjoying . We only become successful but not satisfied.

Satisfaction give us success but success can not give us satisfaction. Some time we reach at our destination even we are not happy. When we choose our aim we should be more careful and remember one thing about will it make as satisfied or successful.

Achieve a success is not too hard but living with these things which we do not like or we do not want is so difficult we choose the thing that we do not like then we will never be happy through the who life. So we should give more importance to the happiness than material things and our life will be really beautiful.

**Auja Lenddle**
S.Y., B.A.



# Life lessons from a Baby Giraffe

Baby giraffes never go to school. But they learn a very important lesson rather early in life. A lesson that all of us would do will to remember.

The birth of a baby giraffe is literally in an earth shaking event. The baby falls from its mother's womb near about eight feet above the ground. It shrivels up and lies still, to a weak to move.

The mother giraffe lovingly lowers her neck to kiss the baby giraffe and then something incredible happens. She lifts one long leg and kicks the baby giraffe, sending it flying up in the air and tumbling down on the ground. As the baby lies curled up, The mother kicks the baby again and again. Until the baby giraffe, still trembling and tired, pushes its limbs and, for the first time learns to stand on its feet.

Being happy to see the baby standing on its own feet, the mother giraffe comes over and gives it yet another kick. The baby giraffe falls one more time, but now, quickly recovers and stands up. Mama giraffe is delighted. She knows that her baby has learned an important lesson, no matter how hard you fall, always remember to pick yourself up and get back on your feet.

So the next time you find a supervisor or a parent kicking you do not upset with them. like the mother giraffe, they may only be trying to teach you one of life's most important lesson. It does not matter how many times you fall. What matters is your ability to pick yourself up and stand on your feet once again.

The lessons we learn early become part of our habit, our instinct and stand us in a good stead all through our lives an important lesson to learn I this; never mind how hard you fall, always remember to pick yourself up and get back on your feet.

**Monika Bhagwatkar**
M.A. Part-I English



# Women

Throughout your life you will meet many dear and sweet dangerous and complicated peaceful and wild women. Her mouth is always fall sweet word. she is loving and caring for her family. She takes good care of herself and her family. she through the whole day plays many roles like mother, sister, good friend, aunty, wife and also take care of relations of the family. She gives first priority to her family. First teacher of our life is mother. like Jijamata was the first teacher of Shivaji Maharaj and made them "King of India".

Now a days women are empowering with education, employment, decision making and better health in view of a equality in a society. You can support women from your family. You can start for financially independent, educated, and progressive enjoying a good social environment from your family, If you support your sister, mother, wife and friend, definitely she will be independent. Give good education to women. They need to be encouraged to go for higher studies. If she will get an education, definitely she will be independent. Without good education she will not be able to develop her inner talent and skills for effective communication. Now a days she is a good housewife also good business woman. That's why it is essential to give her an education. This voice should also reach to the village. Village people do not allow women to take and education. An education is the key factor in the development of the country and the people living over there. Women have a right to their freedom and live happy life. Education is one of the most important means of empowering women with the knowledge skills and self confidence. Some village women are not allowed to have an education as they are meant to do household chores, which help them after marriage.

Women are struggling in many fields. Give the respect to women. Swami Vivekanand one of the greatest son of India quoted that " There is no chance for the welfare of the world unless the condition of women is improved, It is not possible for a bird to fly on only one wing.

**Dipali Walke**
M.A. part -I English




# Unemployment Problem In India

Like all other developing nations. India is on the path of progress now. We are all influenced by the materialism of the west that is ruling the Indian society. It can create a lot of changing perceptions and high aspirations in the mind of the Indians. I think the main drawback of a white collar job starts from here. Unemployment shall remain as a huge problems, as soon as the educated persons in India who are preferring to work in offices only. The mentality of graduates should change. Every job is having its own values, efforts and results. It should be the pleasure of life. Graduates seldom like to live in native villages and then the cities are crowded. In such a state how we can solve the problem of unemployment?

School is the basic foundation for the upcoming generation. Education is the power to bring out one's best in qualities and talents. It helps intellectual culture. But now the schools and colleges are highly competitive in the field or private sector. They are trying to inculcate the ideas of high ambitions and achievements that leads to the path of restless and self centeredness. I consider this as a major issue in which we have to adopt certain changes in the curriculum system. There are about 4 crore educated persons in India who are seeking employment in offices. Job is the major criteria of status and not considering as an essential part of financial stability. We are surrounded with lot of opportunities. Our eyes are searching only to find out the jobs where high salary is paid monthly. Those who were returned and are getting pensions seek jobs else where and try to earn more than before. Many officers were considering the main job as only subsidiary and what they earn extra is important. This creates the loss of opportunities to the young people.

It is now evident that unemployment lies in the hands of each and every individual. We should need the courage to change the attitude and mentality of our youth. Our country also needs the open minded youth who is ready to do any job by accepting the value. It will definitely lead to the solution for the unemployment problem in India.

**Mrs. Neeta Yadav**

# Paint Your Life

Life is like a piece of art,
It requires lots of heart,
Choose your paint
and your brush,
Take your time,
and avoid the rush.
Before you paint,
choose your theme,
Don't be afraid,
to follow your dream
It's alright, to make a mistake
Your painting is real,
it's not fake
Look at your painting,
don't be crying
Begin again, keep on trying
Your painting is never full complete,
Enjoy the process,
make sure it's sweet !

**Patil Priyanka R.**
M.A. (First) English

# *My* CHILD

With a happiness and joy
You come in our life....

With a golden heart
you make us smile


With a courage
You forget the scars...
with a strong desire
You achieve the goals...
with a diligent flexibility,

You enjoy rewards...
With a bright sunshine

You are truly a twinkling star
you are my child

a precious gem,
God's greatest gift !

**Prof. Landge R. R.**



# My Ideal Personality

The man who spread the Indian culture in the world. He told the people about Indian power. He dilated the Indian culture in America in 1893, at world's parliament of Religious which was held in Chicago. That person's name was Swami Vivekananda, who was born on January 12,1863 in Bengali one family of Calcutta. His real name was Narendranath Vishwanath Datta. His father was Attorney General Lawyer at the Calcutta High court.

Swami Vivekananda was one of the best personalities in the history of India. His work is always remembered as the big contribution to Indian History. His mother helped to shape his thinking power and personality. He was very, intelligent at his childhood also he was naughty at childhood.

Swami Vivekananda said that if you lost your wealth, you lost nothing, But if you lost your character, you lost everything. I believe in this thought because the person is made by the character. A person's character was attracted by the wealth. but the person can not buy good character from his money. People give more importance to many than the character.

Swami Vivekananda's personality was well known in both country India and America. When we heard about the parliament of Religions held in Chicago in 1893 that time Swami Vivekananda was going to America to represent the Hinduism. The people who saw or heard Vivekananda's that time they got attracted to him and his views. His vast knowledge, well and broad thinking about all human being. His conversation was once heard by people they did not wanted to never end his speech or conversation.

His knowledge of the Vedas philosophy was deep. In Chicago he addressed to the world about our four Vedas that are samved, Atharvaved, Yajurved and Hrigved. The Vedas are taught to the world by him.

